cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२३३ | सोमवार, दि.१६ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### राष्ट्रवादीचे एकीकरण अशक्यच्या गटात मोडत नाही

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजितदादादा पवार यांच्यातील कौटुंबिक भेट चर्चेच्या केंद्रस्थानी असतानाच शरद पवार गटाचे बडे नेते व भाजपाच्या केंद्रीय नेत्यांमध्ये दिल्लीत खलबते झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या राजकारणात पुन्हा नवे समीकरण जन्माला येण्याची चिन्हे दिसून येऊ लागली आहेत. लोकसभा निवडणुकीत भरवशाच्या महाराष्ट्रातच मोदी सरकारची मोठी पीछेहाट झाली. ४८ पैकी केवळ १७ जागांवर महायुतीला समाधान मानावे लागले. तर महाविकास आघाडीने ३० जागा पटकावल्या.

## दोन दिवसात खातेवाटप – फडणवीस

नागपुर–राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन विस्ताराबाबत माहिती दिली. तसेच येत्या दोन दिवसात खातेवाटप केले जाणार असल्याचे सांगितले. विस्तारात ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली असून कोणाला कोणते खाते मिळणार याविषयी आता सर्वांना उत्सुकता आहे. त्यातच फडणवीस यांनी स्वत:च खाते वाटबाबात माहिती दिली. त्यामुळे मलाईदार खाते कोणाला मिळतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## भुजबळ, पडळकरांना डावलल्याने नांराजी

**बीड । प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळात माजी मंत्री व जेष्ठ नेते आ. छगन भुजबळ आणि भाजपचे आ. गोपीचंद पडळकर यांना स्थान न मिळाल्याने माळी आणि धनगर समाजाकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी नागपुर येथे रविवारी दुपारनंतर पार पडला. यावेळी शिंदे सरकारमधील मंत्री व ओबीसी नेते छगन भुजबळ आणि ओबीसी नेते आ. गोपीचंद पडळकर यांची वर्णी लागणार अशी चर्चा होती. मात्र ऐनवेळेला भुजबळ आणि पडळकर यांना वगळण्यात ◀◀ पान २ वर

# सावधान! महाराष्ट्रात थंडीची लाट येणार

## येत्या दोन दिवसात हाडं गोठवणारी थंडी पडणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं कडाक्याची थंडी जाणवत आहे, तर कुठं ढगाळ वातावरअ असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या दोन दिवसात संपूर्ण महाराष्ट्रात थंडीची लाट येणार आहे. ◀◀ पान २ वर




### राज्यातील पावसाचे वातावरण निवळले

सध्या राज्यातील सर्वच ठिकाणी वातावरण बदल होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. हा पाऊस फळपिकांसाठी धोकादायक असतो. त्यामुळं द्राक्ष, डाळिंब केळी उत्पादक शेतकरी चिंतेत होते. मात्र, सध्या राज्यातील पावसाचं वातावरण निवळले आहे. पुन्हा एकदा राज्यात थंडीचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

# टिम देवेंद्र फायनल!

## दिग्गजांना वगळले: ३३ कॅबिनेटसह ६ राज्य मंत्र्यांनी घेतली शपथ



**नागपुर । प्रतिनिधी**

**होईल..होईल म्हणता म्हणता टिम देवेंद्र अखेर फायनल झाली आहे. नागपुरातील हिवाळी अधिवेशनाच्या आदल्या दिवशी म्हणजेच रविवारी शपथविधी सोहळा पार पडला आहे. हा मंत्रीमंडळ विस्तार हा फडणवीस यांच्या विचाराचा आणि अमलाचा असल्याचे दिसून आले. त्यामुळे या विस्तारावर देवाभाऊंचा वरचष्मा असल्याचे दिसते. तर या शपथविधीत महायुतीच्या छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, दिपक केसरकर, अब्दुल सत्तार, रविंद्र चव्हाण या विद्यमान दिग्गज मंत्र्यांना वगळण्यात आले असून ३३ कॅबिनेट आणि ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली आहे. विशेष म्हणजे फडणवीस यांनी भाकरी फिरवत २५ नविन चेहऱ्यांना संधी दिली आहे.** सविस्तर वृत्त पान २ वर

### मराडवाड्याला ६ मंत्रीपदे, ३ नवे चेहरे

मराठवाड्यात ६ मंत्रीपदे देण्यात आली असून यापैकी ३ नविन चेहरे आहेत. यात संजय सिरसाट, बाबासाहेब पाटील, मेघना बोर्डीकर हे नवे चेहरे असून पंकजा मुंडे, धनंजय मुंडे आणि अतुल सावे हे अगोदर मंत्री राहीलेले आहेत.

### शपथ घेणारे कॅबिनेट मंत्री

१) चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा, २) राधाकृष्ण विखे पाटील, भाजपा, ३) चंद्रकांत पाटील, भाजपा,४) गिरीश महाजन, भाजपा, ५) हसन मुश्रीफ, राष्ट्रवादी कॉंग्रेस, ६) गुलाबराव पाटील, शिवसेना, ७) गणेश नाईक, भाजपा, ८) दादा भुसे, शिवसेना, ९) संजय राठोड, शिवसेना, १०) धनंजय मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस, ११) मंगलप्रभात लोढा, भाजपा, १२) उदय सामंत, शिवसेना, १३) जयकुमार रावल, भाजपा, १४) पंकजा मुंडे, भाजपा, १५) अतुल सावे, भाजपा, १६) अशोक उईके, भाजपा, १७) शंभूराज देसाई, शिवसेना, १८) आशिष शेलार, भाजपा, १९) दत्तात्रय भरणे, राष्ट्रवादी कॉंग्रेस, २०) आदिती तटकरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस, २१) शिवेंद्रराजे भोसले, भाजपा, २२) माणिकराव कोकाटे, भाजपा, २३) जयकुमार गोरे, भाजपा, २४) नरहरी झिरवाळ, राष्ट्रवादी कॉंग्रेस, २५) संजय सावकारे, भाजपा, २६) संजय शिरसाट – शिवसेना, २७) प्रताप सरनाईक, शिवसेना , २८) भरत गोगावले, शिवसेना, २९) मकरंद पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस, ३०) नितेश राणे, भाजपा, ३१) आकाश फुंडकर, भाजपा, ३२) बाबासाहेब पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस, ३३) प्रकाश आबिटकर, शिवसेना

### राज्यमंत्री


१) माधुरी मिसाळ, भाजपा, २) आशिष जैस्वाल, शिवसेना, ३) पंकज भोयर, भाजपा , ४) मेघना बोर्डीकर, भाजपा , ५) इंद्रनील नाईक, राष्ट्रवादी कॉंग्रेस, ६) योगेश कदम, शिवसेना

# मान गए डीएम!

## कडवा विरोध असताना पहिल्या दहामध्ये धनंजय मुंडेंनी घेतली शपथ

**बीड । प्रतिनिधी**

कणखर नेता, अभ्यासू वक्ता, आक्रमक बाणा, काम करण्याची सतत तळमळ या जोरावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासह राज्याच्या राजकारणात महत्वाचे स्थान मंत्री धनंजय मुंडे यांनी निर्माण केले. राज्यात तिसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक मताधिक्य मिळवत परळीतून दुसऱ्यांदा विजय मिळवला. त्यामुळे अगदी सहज वाटणारे मंत्रीपद एका घटनेमुळे तासा–तासाने दुर जात होते. शिवाय मंत्रीपद मिळू नये म्हणून बीड जिल्ह्यातील काही आमदार आणि नेत्यांनी अक्षरश: देव पाण्यात ठेवले होते.



मात्र हार मानणार तो धनंजय मुंडे कसला. शेवटपर्यत किल्ला लढवला आणि पहिल्या १० मध्ये कॅबिनेट मंत्री पदाची शपथ देखील घेतली. त्यामुळेच की काय आता संपुर्ण महाराष्ट्रात त्यांचे समर्थक म्हणतात, मान गए डीएम बॉस.

राजकारणात कधी काय होईल, कोण कोणाचा शत्रु होईल, कोण कसा काटा काढण्याचा प्रयत्न करीन, कोणाच्या काय मनात असेल हे कधीही सांगता येत नाही. विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघात ३ सभा घेऊन धनंजय मुंडे यांनी वातावरण फिरवले. प्रकाश सोळंके यांच्या बाजूने ओबीसी मते झुकली. डोंगर पट्ट्यात दादांना त्याचा फायदा नव्हे तर प्रकाशदादा त्याच डोंगर पट्ट्यामुळे पाचव्यांदा आमदार झाले आणि डोंगर पट्टा हा ओबीसी बहुल आहे. गेवराई मतदार ◀◀ पान २ वर

## बीडला दोन कॅबिनेट मंत्री; विकासाला गती मिळणार

# पंकजाताई, धनुभाऊ, माजुरे कार्यकर्ते दुर ठेवा..!

## मुंडे बहिण –भाऊ बनले मंत्री; बीडकरांचा दुहेरी जल्लोष

**बीड । प्रतिनिधी**

पाच वर्षानंतर पंकजा मुंडे यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतली. तसेच त्यांचे बंधु धनंजय मुंडे यांनी सुध्दा पहिल्या दहामध्ये कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडला दोन मंत्रीपदाची भेट दिली असून त्यामुळे आता जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार आहे. मुंडे बहिण–भाऊ मंत्री झाल्याने



बीडकरांनी रविवारी दुहेरी जल्लोष साजरा केला. खऱ्या अर्थाने जिल्ह्यात दिवाळी साजरी करण्यात आली. तर यावेळी पंकजाताई आणि धनुभाऊ यांनी माजुरे कार्यकर्ते बाजुला फेकायला ◀◀ पान २ वर

### » टक्केवारी किंग, सुपारी बहाद्दर बाजूला फेका

पंकजा मुंडे किंवा धनंजय मुंडे हे मंत्री झाल्यावर त्यांच्या आवतीभोवती फिरणारे खुप आहे. जे की एरव्ही कधीही दिसत नाही, पण पंकजाताई, धनुभाऊ आले की त्यांची सावली सुध्दा सोडत नाही. त्यामुळे अधिकारी, कर्मचारी आणि नागरीकांना वाटते की हेच धनुभाऊ आणि ताईंच्या जवळचे आहेत. त्याचा फायदा घेत काहीज सुपारी बहाद्दर तर काही जण टक्केवारी किंग बनले आहेत. त्यामुळे अशा लोकांना आता बाजूला फेका, अशी मागणी होऊ लागली आहे.

### देवाभाऊंच्या चार लाडक्या बहिणी मंत्रिमंडळात

नागपुर: या मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून पंकजा मुंडे, अदिती तटकरे, राज्यमंत्री म्हणून मेघना बोर्डीकर, माधुरी मिसाळ यांनी शपथ घेतली. ज्या लाडक्या बहिणींनी देवेंद्र फडणवीसांना तिसऱ्यांदा मुख्यमंत्री केले. त्यांच लाडक्या बहिणींचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या मुंडे, तटकरे, बोर्डीकर, मिसाळ या चार लाडक्या बहिणींना देवाभाऊंनी मंत्रीमंडळात संधी दिली आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ०.५० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड: १८.०० क्विंटल | १,९८१ | २,४०० | २,१५० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ८.०० क्विंटल | ५,००० | ६,८०१ | ६,१३७ |
| उडीद : ४.०० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| बाजरी: २१.०० क्विंटल | २,०४१ | ४,३३० | ३,५११ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| सोयाबीन: ३७.५० क्विंटल | ३,९६६ | ४,०२० | ३,९९१ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |




cmyk

## अग्रलेख

# ‘यंगेस्ट’ जगज्जेता!

‘हवा में उडता जाए, मोरा लाल दुपट्टा मलमल का’च्या वयात चेन्नईच्या दोम्माराजू गुकेशने ६४ घरांच्या पटावर जगज्ञेतेपदाची मोहोर उमटवली. काळ्या मोहऱ्यांनिशी खेळणाऱ्या गुकेशने सिंगापूर येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत गुरूवारी चीनच्या डिंग लिरेनची अभेद्य भिंत १४ व्या आणि अखेरच्या डावात भेदली. माजी विश्वविजेत्या ३२ वर्षीय लिरेनला १८ वर्षीय गुकेशने चितपट करून भारतीय तिरंगा डौलाने फडकावत बुद्धिबळ इतिहासातील सर्वांत युवा जगज्ञेता बनण्याचा मान मिळवला. भारतीय बुद्धिबळ क्षेत्रासाठी गुरूवारचा दिवस गुकेशने संस्मरणीय ठरवला. विश्वनाथन आनंदनंतर गुकेश भारताचा दुसरा जगज्ञेता ठरला. गुकेशने रशियाच्या गॅरी कास्पारोव्हचा (२२ व्या वर्षी) गत १४ वर्षापासूनचा युवा जगज्ञेतेपदाचा विक्रम मोडीत काढत नव्या अध्यायाची नोंद केली. सुमारे ४ तास रंगलेल्या १४ व्या आणि अखेरच्या फेरीत डिंग लिरेनला ५८ चालींमध्ये पराभूत होण्यास भाग पाडणारा गुकेश हा जगातील एकूण १८ वा जगज्ञेता ठरला.

वयाच्या १८ व्या वर्षी १८ वा जगज्ञेता! लिरेनने १३८ वर्षाच्या बुद्धिबळ जगज्ञेतेपदाच्या इतिहासात केलेली सर्वांत मोठी घोडचूक गुकेशच्या पथ्यावर पडली. १४ वा डाव बरोबरीत सुटला असता तर शुक्रवारपासून टायब्रेकरद्वारे सामन्याचा निकाल लागला असता मात्र गुकेशने ७.५-६.५ अशा फरकाने विजय मिळवत जगज्ञेतेपदाला गवसणी घातली. पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना लिरेनने डावाची आश्वासक सुरुवात केली होती. गुकेशने डावाच्या मध्यात आपली पटावरील स्थिती मजबूत केली होती त्यामुळे ही लढत बरोबरीत सुटेल, असे वाटत असतानाच लिरेनने १९ व्या चालीत मोठी चूक केली आणि त्याचा फायदा उठवत गुकेशने लिरेनला चेकमेट केले. जगज्ञेतेपदाची ही लढत गुकेश १२ व्या फेरीआधीच सहज जिंकेल, असे भाकित अनेक बुद्धिबळ पंडितांनी वर्तवले होते. कदाचित त्यांना गत वर्षभरापासून मोजक्याच स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या लिरेनच्या ताकदीचा अंदाज आला नसावा.

स्पर्धेला प्रारंभ झाल्यानंतर पहिल्याच फेरीत लिरेनने पांढऱ्या मोहऱ्यांसह गुकेशला पराभूत केले होते; परंतु गुकेशने ‘हार नही मानुंगा’ असे म्हणत तिसऱ्या फेरीत लिरेनला जशास तसे प्रत्युत्तर देत पराभवाचा बदला घेतला होता. त्यानंतर सलग ७ डाव बरोबरीत सोडवल्यानंतर गुकेशने ११ व्या डावात विजय मिळवत आघाडी घेतली होती; परंतु लिरेनने जोरदार मुसंडी मारत १२ वा डाव जिंकला आणि सामना बरोबरीत आणला. ६.५-६.५ अशा गुण बरोबरीत अखेरचा डाव सुरू झाला. या डावात पांढ-या मोहऱ्यांसह खेळणाऱ्या लिरेनची घोडचूक गुकेशच्या पथ्यावर पडली आणि प्रतिस्पर्ध्याला ‘चेकमेट’ देत गुकेशने पहिल्याच प्रयत्नात जगज्ञेतेपदावर आपले नाव कोरले. सामन्यानंतर गुकेश म्हणाला, गत दशकभरापासून मी या क्षणाचे स्वप्न बघत होतो. १४ वा डाव ज्या प्रकारे सुरू झाला तो पाहता मला जिंकण्याची खात्री नव्हती; पण मला प्रतिस्पर्ध्यावर दडपण टाकण्याची संधी मिळाली आणि मी ती साधली. या स्पर्धेत गुकेश पहिल्या डावात पराभूत झाला होता; परंतु अखेरच्या डावात त्याने काळ्या मोह-यांनिशी लिरेनवर बाजू उलटवली.

२०१० मध्ये विश्वनाथन आनंदने बल्गेरियाच्या टोपालोवविरुद्ध पहिल्याच डावात हार पत्करली होती; पण १२ डावांच्या त्या लढतीत अखेरच्या डावात काळ्या मोह-यांनिशी खेळून टोपालोववर बाजी उलटवत आनंदने जगज्ञेतेपद पटकावले होते. २०२४ मध्ये त्या इतिहासाची पुनरावृत्ती घडली २००६ मध्ये जन्मलेल्या गुकेशने वयाच्या सातव्या वर्षापासूनच बुद्धिबळ खेळण्यास प्रारंभ केला. त्याचे वडील रजनीकांत हे तज्ज्ञ डॉक्टर आहेत तर आई पद्मा यांनी जीवशास्त्रात डॉक्टरेट मिळवली आहे. गुकेशने २०१५ मध्ये ९ वर्षाखालील गटात आशियाई शालेय स्पर्धा जिंकली. २०१८ मध्ये १२ वर्षाखालील गटात जागतिक युवा स्पर्धेचे जेतेपद मिळवले तर याच सालात आशियाई युवा स्पर्धेत तब्बल ५ सुवर्ण पदके जिंकण्याची किमया साधली. २०१७ पासून गुकेश वरिष्ठ गटात (खुल्या) खेळण्यास पात्र ठरला. ऑक्टोबर २०२२ मध्ये गुकेशने जलद बुद्धिबळ स्पर्धेत मॅग्नस कार्लसनला पराभवाचा धक्का दिला होता. मॅग्नस त्या वेळचा जगज्ञेता होता. या विजयामुळे गुकेशकडे जगाच्या नजरा वळला होत्या.

२०२४ मध्ये गुकेशने कँडिडेटस्? स्पर्धेत बाजी मारली. त्यानंतर भारतीय पुरुष संघाला ऑलिम्पियाड सुवर्ण मिळवून देण्यात मोलाची कामगिरी केली आणि आता जागतिक जेतेपद मिळवून आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. जागतिक लढतीत एकूण १४ पारंपरिक (क्लासिकल) डाव होतात. सर्वप्रथम ७.५ गुणांचा टप्पा गाठणारा खेळाडू विजेता ठरतो. पहिल्या ४० चालींसाठी १२० मिनिटे, पुढील २० चालींसाठी ६० मिनिटे आणि उर्वरित चालींसाठी १५ मिनिटांचा वेळ दिला जातो. काळ्या मोह-यांनी ४० चाली होत नाहीत तोवर सामना बरोबरीत सोडवता येत नाही. १४ डावानंतरही गुण बरोबरी राहिल्यास विजेता ठरवण्यासाठी टायब्रेकरचा आधार घेतला जातो. गुकेशला विश्वनाथन आनंदचे मार्गदर्शन लाभले आहे. अखंड मेहनतीचे फळ त्याला मिळाले आहे. एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रीत करण्याचे कौशल्य त्याच्याकडे आहे. इतक्या कमी वयात त्याने जी प्रगल्भता दाखवली ती वाखाणण्याजोगी आहे. तो बेधडक, आत्मविश्वासपूर्ण खेळ करतो. मोक्याच्या क्षणी संतुलन ढळू न देण्याचा गुण त्याच्याकडे आहे. गुकेशचे कौशल्य आणि मानसिक स्थैर्य अफलातून असेच होते. त्याने शेवटपर्यंत जिंकण्याची जिद्द सोडली नाही. या उलट लिरेनने बचावात्मक खेळावर अधिक भर दिला शिवाय तो टायब्रेकरवर अति विसंबून राहिला. ढासळलेल्या मनोवृत्तीतून त्याला सावरता आले नाही. त्याने गुकेशच्या विजयाचे कौतुक केले आहे. या जेतेपदाबद्दल गुकेशला १३ लाख अमेरिकन डॉलर्सचे बक्षीस मिळाले आहे. भारताकडे गुकेशसह आर. प्रज्ञानंद, विदीत गुजराथी, दिव्या देशमुख, तानिया सचदेव, असे असंख्य गुणवान बुद्धिबळपटू आहेत. यंदाचे वर्ष भारतीय बुद्धिबळाचा कायापालट करणारे वर्ष ठरले आहे. वर्षाच्या प्रारंभीच नागपूरच्या दिव्या देशमुखने कनिष्ठ गटाचे जागतिक जेतेपद मिळवले असून ३ बुद्धिबळपटू कँडिडेटस्? स्पर्धेसाठी पात्र ठरले. ६४ घरांचा राजा गुकेशला मानाचा सलाम! हिंदी चित्रपट गीतात मुकेश तसा बुद्धिबळात गुकेश!

# अखेर देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाचा झाला विस्तार

पान १ वरून

**नागपूर- देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन अकरा दिवस झाले तरी मंत्रिमंडळाचा विस्तार होत नव्हता. त्यामुळे विरोधकांकडून सुद्धा मोठ्या प्रमाणात टीका करण्यात येत होती. अखेर फंड विषयांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला असून यामध्ये ३३ कॅबिनेट आणि सहा राज्यमंत्री असे एकूण ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली आहे.**

याआधी ५ डिसेंबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतली होती. मुंबईत मोठा सोहळा पार पडला होता. पण त्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार रखडला होता. महायुतीत खातेवाटपावरुन एकमत होत नसल्याने विस्तार रखडल्याचे बोलले जात होते. पण अखेर आज शपथविधी सोहळा पार पडला आहे. मंत्रिमंडळ विस्तारात एकूण ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली आहे. यामध्ये भाजपाचे १९, शिवसेनेचे ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ मंत्र्यांनी शपथ घेतली. यामध्ये ३३ जणांनी कॅबिनेट तर ६ जणांनी राज्यमंत्रीपदाची शपथ घेतली. भाजपाच्या ३, शिवसेनेच्या २ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका मंत्र्याला राज्यमंत्रीपदाची शपथ देण्यात आली आहे. तर या विस्तारात छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, अब्दुल सत्तार, दिपक केसरकर, रविंद्र चव्हाण यांना वगळण्यात आले आहे. शपथ घेणाऱ्या ३० मंत्र्यांपैकी जवळपास ४० टक्के मंत्री नवे चेहरे आहेत.






### या २५ नवीन चेहऱ्यांना संधी

शिंदे यांच्या मंत्रिमंडळापेक्षा अनेक वेगळी नाव फडणवीस मंत्रिमंडळात आली आहे. एकूण २५ नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. त्यात चंद्रशेखर बावनकुळे, गणेश नाईक, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अशोक उइके, आशीष शेलार, दत्तात्रेय भरणे, शिवेंद्रराजे भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, नरहरी झिरवाळ, संजय सावकारे, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगवले, मकरंद पाटील, नितेश राणे, आकाश फुंडकर, बाबासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर, माधुरी मिसाळ, आशीष जैस्वाल, पंकज भोयर, मेघना बोर्डिकर, इंद्रनील नाईक यांचा समावेश आहे.

### १६ जिल्हाला मंत्रीपदे, १९ जिल्ह्यांना संधी नाही

राज्यातील १९ जिल्ह्यांमध्ये मंत्रीपदे आहे. परंतु १६ जिल्ह्यांमधी मंत्री म्हणून कोणालाच संधी नाही. पुणे, जळगाव-नाशिकमधून तीन-तीन मंत्री झाले आहेत. तसेच साताऱ्यास सर्वाधिक चार मंत्रीपदे दिली. मराठवाड्यात बीड २, संभाजीनगर २, परभणी १, लातूर १ अशी ६ मंत्रीपदे दिली तर जालना, धाराशिव, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्याला संधी देण्यात आली नाही.

### बंडात दादांसोबत, तरीही पत्ता कट

अजित पवार यांनी जेव्हा बंड केले तेव्हा त्यांच्यासोबत छगन भुजबळ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धर्मरावबाबा आत्राम, आदिती तटकरे, संजय बनसोडे आणि अनिल पाटील यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. मात्र यावेळी यातील छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धर्मरावबाबा आत्राम, संजय बनसोडे आणि अनिल पाटील यांचा पत्ता कट झाला आहे. तर धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, आदिती तटकरे यांना पुन्हा एकदा संधी मिळाली आहे.

### २०-१२-१० फॉर्म्युला

विधानसभेचे हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबर ते २१ डिसेंबरदरम्यान पार पडणार असून त्यापूर्वी एकूण ३९ मत्र्यांना शपथ देण्यात आली. यात भाजप २०, शिंदेसेना १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेस १० असे मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री असे ४२ मंत्र्यांचे हे फडणवीसांचे मंत्रीमंडळ बनले आहे.

### परभणी जिल्ह्याला चौदा वर्षानंतर मंत्रीपद

गेल्या १४ वर्षामध्ये परभणी जिल्ह्याच्या वाट्याला मंत्रीपद आले नव्हते. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष मोठा असून आता तब्बल १४ वर्षानंतर मेघना बोर्डीकर यांच्या रुपाने परभणी जिल्ह्याला राज्य मंत्रीपद मिळाले आहे.

### शिंदे यांनी लिहून घेतले शपथपत्र

मिळालेल्या माहितीनुसार शिवसेनेच्या मंत्र्यांकडून एक प्रतिज्ञापत्र लिहून घेतले जाणार आहे. ज्या नेत्यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आलेली आहे, त्यांना फक्त अडीच वर्षे मंत्रिपद दिले जाईल. त्यानंतर हे मंत्रिपद सोडून द्यावे लागणार आहे. याबाबत प्रतिज्ञापत्रात नमूद केलेले असणार आहे. मंत्रिपदाच्या शपथविधीआधी शिवसेना पक्षाची एक बैठक झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांन्या ही माहिती दिलेली आहे. मंत्र्यांना त्यांनी पूर्वकल्पना दिलेली आहे.

### अजितदादांकडूनही अडीच वर्षांच्या फॉर्म्यूल्याचे संकेत

दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील मंत्रिपद मिळालेल्या नेत्यांना फक्त अडीच वर्षांसाठीच या पदावर राहता येईल, असे संकेत दिले आहेत. त्यांनी पक्षाच्या एका कार्यक्रमात भाषणादरम्यान यावर भाष्य केलेले आहे. भाजपामध्ये मात्र हा फॉर्म्यूला पाळला जाणार की नाही, याबाबत अस्पष्टता आहे.



मुंबई : महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सागर बंगल्यावर जाऊन अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या

# बेलगाव येथे रेणुकाई देवीची यात्रा संपन्न

## निसर्गरम्य वातावरणात भव्य कुस्त्यांचा आखाडा;भाविकांची दर्शनासाठी मांदियाळी

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील जागृत देवस्थान असलेले आराध्य दैवत श्री रेणुकाई मातेचा पौर्णिमेला दत्तजयंती दिवशी यात्रा मोठया उत्साहात साजरी झाली. तीन दिवस हा यात्रा महोत्सव चालतो.पहिल्या दिवशी विधीवत पौर्णिमेदिवशी देवीची पालखी छबिना मिरवणूक,ऑर्केस्ट्रा, दुसऱ्या दिवशी भव्य मल्लाचा हंगाम भरला या हंगामाला महाराष्ट्रातुन नामांकित मल्ल हजेरी लावली होती.हा हंगाम व यात्रा बेलगाव परिसरातील अठेगावपुठ्यात प्रसिध्द आहे.तिसऱ्या दिवशी यात्रा गावात भरते.यात्रेच्या दरम्यान देवीचा परिसर भाविक भक्तांच्या गर्दीने गजबजून केला होता.**



यावर्षी रेणुकाईमाता देवस्थानला ‘‘ब‘‘ दर्जा प्राप्त झाल्याने आणि माजी राज्यमंत्री सुरेश आण्णा धस यांच्या विशेष प्रयत्नाने ४ कोटी ९० लक्ष रुपयांचा भरघोस निधी मिळाल्याने देवस्थान परिसरात विविध विकास कामे प्रगतीपथावर असून देवस्थानचा कायापालट पाहायला मिळाला असल्याने भाविकांनी यावेळी होत असलेल्या विकास कामाबद्दल समाधान व्यक्त केले. देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक जागृत पीठ म्हणजे माहूरची श्री रेणुकामाता तिचेच उपपीठ म्हणून बेलगावच्या रेणुकादेवीचे ओळख आहे.महाराष्ट्रातील व बेलगाव ग्रामस्तांची ही कुलदेवता आहे. रेणुका देवीला यात्रेनिमित्त विशेष साज,शृंगार चढवला जातो.सोन्याचे दागिणे आणि अलंकार देवीला चढविण्यात आले होते.दागिण्यांनी सजलेल्या रेणुका देवीचं नयन मनोहरी रुप प्रत्यक्ष डोळ्याने पाहण्यासारखे होते. शिखरावर चढत असताना दोन्ही बाजूने व्यापाऱ्यांनी आपली दुकाने थाटली होती. बेलफुल, पेढा तसेच रेणुका आईला नऊवारी साडी, बांगडी, खेळणे,राहड गाडगे,तसेच विविध वस्तूंची दुकानांनी यात्रा सजली होती. नदीच्या गाठी वसलेल्या या निसर्गरम्य वातावरणातील या मंदिराजवळील भव्य कुस्त्यांचा आखाडा भरला होता.

## पान १ वरून...

### पंकजाताई, धनुभाऊ..माजुरे

हवेत, अशी मागणी होऊ लागली आहे. ठाकरे आणि शिंदे सरकारमध्ये धनंजय मुंडे हे कॅबिनेट मंत्री होते. अगोदर सामाजिक न्याय मंत्री आणि त्यानंतर शिंदे सरकारमध्ये कृषीमंत्री पदाची त्यांनी जबाबदारी सांभाळली. या दरम्यान त्यांनी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे करण्यासाठी निधी खेचून आणला. तर २०१९ मध्ये परळीतून पराभव झाल्याने पंकजा मुंडे या सक्रीय राजकारणापासून अलिप्त होत्या. भाजपकडूनही त्यांचे राजकीय पुनर्वसन केले गेले नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बीडमधून त्यांचा निसटता पराभव झाला. या निवडणुकीत कमालीचा जातीवाद बोकाळला होता. त्याचाच फटका मुंडे यांना बसला असल्याचे म्हटले जात आहे. त्यानंतर ओबीसी-मराठा संघर्ष सुरु झाला तो विधानसभेपर्यंत होता. याच दरम्यान भाजपने पंकजा मुंडे यांना विधान परिषदेवर घेतले. विधानसभा निवडणुकीत त्यांनी राज्यभर सभा घेतल्या. ज्या मतदार संघात सभा घेतल्या तेथील ७० टक्के महायुतीचे उमेदवार विजयी झाले. मुंडे यांच्या सभेने राज्यातील ओबीसी समाज महायुतीच्या बाजुने झुकला. त्याचा फायदा या निवडणुकीत झाल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांना मंत्रीमंडळात घेतले जाईल, असे म्हटले जात होते. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंडे बहिण - भावाला मंत्री करुन बीड जिल्ह्याला मोठी भेट दिली आहे. दोन मंत्री आणि तेही कॅबिनेट असल्याने आता बीड जिल्ह्याचा विकास मोठ्या प्रमाणात होईल असे दिसते. मुंडे बहिण-भावाला मंत्रीपद मिळाल्याने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरा करण्यात आला असून चौकाचौकात तोफा वाजवण्यात आल्या आहेत. दरम्यान मुंडे बहिण-भावाच्या नावावर काहीही करणारे जिल्ह्यात मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नेते सुध्दा आहेत, अशा माजुऱ्या कार्यकर्ते आणि नेते तांदळातील खड्या सारखे बाजूला फेकले गेले पाहिजेत, अशी सामान्य नागरीकांना अपेक्षा आहे.

------------

### मान गए डीएम!

संघात सभा घेऊन विजयसिंह पंडीत यांना आमदार करण्यासाठी खारीचा वाटा उचलला. बीड जिल्ह्यात ६ पैकी ५ आमदार महायुतीचे आले. मुंडे बहिण-भावाची ताकद त्यातून दिसून आली. त्यामुळे दोघांनाही मंत्रीपद सहज मिळणार असल्याचे बोलले जावू लागले. मात्र मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांचा खून झाला आणि पुर्ण वातावरणच बदलले. खून हा खूनच असतो. त्यात जात, धर्म नसतो, असे म्हणतात. मात्र या खून प्रकरणाच्या आडून काही आमदार आणि नेत्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर डाव टाकायला सुरुवात केली. खंडणीचा गुन्हा वाल्मिक कराड यांच्यावर दाखल झाल्याने या प्रकरणाशी थेट मुंडेंचा संबंध असल्याचे काही नेते बोलू लागले. छत्रपती संभाजीराजे, आ. सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. संदिप क्षीरसागर यांच्या बोलण्याचा रोख हा परळीकडेच होता. माजी मंत्र्यांचा मंत्रीमंडळात समावेश करु नये, यांना पुन्हा मंत्रीपद दिले तर जिल्ह्याचे वाटोळे होईल, असे बोलले जावू लागले. त्यामुळेच की काय राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ पैकी ७ ते ८ मंत्र्यांना फोन गेले पण धनंजय मुंडे यांना फोन आला नाही. त्यामुळे मुंडे यांना वगळे असल्याची चर्चा सुध्दा सुरु झाली. पण धनंजय मुंडे हारले नव्हते. मात्र त्यांचे आतापर्यंतचे काम आणि पक्षासाठी दिलेले योगदान पाहता अजितदादांना सुध्दा धनंजय मुंडे यांना टाळता आले नाही. कडवा विरोध असताना सुध्दा मंत्र्यांच्या यादीत समावेश आणि मंत्रीमंडळ विस्तारात पहिल्या १० मध्ये शपथ घेणे हे तेवढे सोपे नव्हते. ज्यांनी धनंजय मुंडे हे मंत्री होऊ नयेत म्हणून देव पाण्यात ठेवले ते आता हरले असून या लढाईत धनुभाऊ जिंकले आहेत. त्यामुळेच त्यांचे समर्थक म्हणतात, मान गए डीएम बॉस.

------------------------------

### सावधान! महाराष्ट्रातील

राज्यात हाडं गोठवणारी थंडी पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पहाटे ५ चे किमान तापमानं हे बऱ्याच ठिकाणी एक अंकी संख्येवर आले आहे, ही तापमाने सरासरीपेक्षा २ ते ६ डिग्रीपर्यंत खालावून जळगांव अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर बुलढाणा धाराशिव परभणी नांदेड अकोला अमरावती चंद्रपूर नागपूर वर्धा या सर्व जिल्ह्यात या दोन दिवसात थंडीची लाट व काही जिल्ह्यात थंडीची लाटसदृश्य स्थितीची शक्यता जाणवत असल्याची माहिती खुळे यांनी दिली आहे. सध्या जाणवत असलेली अपेक्षीत थंडी बुधवार दिनांक १८ डिसेंबर (संकष्टी चतुर्थी) पर्यंत टिकून राहण्याची शक्यताही कायम आहे. खान्देशातील नंदुरबार धुळे जळगांव अश्या तीन जिल्ह्यात काही ठिकाणी सरासरी असलेल्या साधारण दवांक बिंदू तापमान व वाढलेल्या आर्द्रतेमुळे अति खालावलेल्या किमान तापमानातून, भू-स्फटिकीकरण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

---------

### भुजबळ, पडळकरांना

आल्याने माळी आणि धनगर समाजातून नाराजी व्यक्तकरण्यात येत आहे. बीड जिल्ह्यातही माळी आणि धनगर समाजाने संताप व्यक्त करीत ओबीसीमधील इतर जातींना भाजप न्याय कधी देणार, असा सवाल उपस्थित केला आहे.

-----



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांची कॅबिनेट मंत्रीपदी वर्णी लागल्यानंतर बीडमध्ये नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या समर्थकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष व्यक्त केला

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि.१६ डिसेंबर २०२४


# साहित्य सम्मेलनाच्या निमित्ताने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी -डॉ. शिरीष खेडगीकर यांची अपेक्षा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

साहित्य सम्मेलनाच्या निमित्याने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी अशी अपेक्षा डॉ. शिरीष खेडगीकर यांनी अंबाजोगाई येथे आयोजित ११ व्या साहित्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी व्यक्त केली. या प्रसंगी संमेलनाध्यक्ष बालाजी सुतार, सुदर्शन रापतवार स्वागताध्यक्ष यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.या प्रसंगी रचना यांना डॉ शैला लोहिया लेखिका पुरस्कार, उमेश मोहिते यांना मंदाताई देशमुख कथा लेखन पुरस्कार तर अलीम अजीम यांना प्राचार्य संतोष मुळावकर शिक्षक लेखक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना डॉ. शिरीष खेडगीकर म्हणाले की, लोकाश्रयातून साहित्य सम्मेलन म्हणजे आशादायक गोष्ट आहे. हे सम्मेलन इव्हेंट नव्हे तर मूहमेन्ट व्हावे. अखिल भारतीय साहित्य सम्मेलन झाले त्यावेळी मला सहहागी होता आले आणि त्यामुळे माझी साहित्याकडे ओढी झाली. अनेक लेखक योगेश्वरी शाळे मधुन उदयास आले. हे साहित्य सम्मेलन बहु सांस्कृतिक बनलं आहे.

या साहित्य सम्मेलनाच्या निमित्याने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी अशी अपेक्षा त्यांनी या वेळी व्यक्त केली.या वेळी बोलताना संमेलन अध्यक्ष बालाजी सुतार म्हणाले की, अंबाजोगाई साहित्य संमेलनापासून, मराठवाडा साहित्य संमेलन आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपर्यंतचे सोहळे मी 'निमंत्रित' म्हणून मंचावरून अनुभवलेले आहेत. या सगळ्यात, मला छोट्या संमेलनांबद्दल नेहमीच प्रेम वाटत आलेलं आहे. 'संमेलन' ही गोष्ट व्याख्येत बसवता येणं जरासं कठीण आहे. सुगीच्या हंगामात भरघोस पीक यावं त्याप्रमाणे दिवाळीपासून पुढे पाडव्यापर्यंत वेगवेगळ्या संमेलनांची रेलचेल महाराष्ट्रात असते. काही शहरांत लिट-फेस्टही होतात. 'दर्जा' मात्र मोजक्याच ठिकाणी राखला जाताना दिसतो, साहित्य संमेलनांच्या माध्यमातून अशा प्रकारचा जागर अपेक्षित असतो. किमान तो जागर घडून येण्याच्या दिशेने काही हालचाली अशा संमेलनांच्या माध्यमातून निश्चितपणे घडून येतात, असं मला वाटतं.स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात शिक्षणासाठी आलो, तेव्हापासून या गावाबद्दल मनात जे प्रेम निर्माण झालं, ते आज तीन दशकांनंतरही किंचितसुद्धा कमी झालेले नाही. याचं मुख्य कारण हे, की, हे गाव मुळातच तितका जीव जडण्या लायक, तितका आदर करण्यालायक आहे. कला-साहित्यात रमणारी रसिक आणि समाजकारणात नीतिमत्ता जोपासणारी माणसं मला मिळाली. काही भली, काही वाईटही. अशा सगळ्या माणसांनी गावाला 'गावपण' दिलेलं असतं. अंबाजोगाईपुरता विचार



अंबाजोगाईत ११ व्या साहित्य संमेलनाचे शानदार उदघाटन

केला, तर इथे अशी विराट उंचीची माणसं होऊन गेली, आजही आहेत, ही गोष्ट या गावाबद्दल प्रेम निर्माण करायला पुरेशी आहे. आद्यकवी मुकुंदराजांपासून, 'पासोडी'कार दासोपंतांपासून, प्रखर स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थांपासून, विराट ताकदीचे कादंबरीकार प्रा. रंगनाथ तिवारी आणि सुस्मृत रामकाका मुकद्दम, एकनाथराव गुरुजी, प्रा. शैला लोहिया; उर्दूतले कवी वफा साहेब यांच्या सह बहुसंख्य विविध क्षेत्रा मधील व्यक्तिमत्व या संदर्भात मुद्दाम उल्लेख करावाच लागेल असा इथला यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह! सुजन राजकारणी असलेल्या सुस्मृत भगवानराव लोमटे यांच्या पुढाकारातून चालू झालेल्या आणि मागच्या तीन दशकांपासून दगडू लोमटे यांनी महाराष्ट्रभर एकहाती नावारूपाला आणलेल्या या समारोहाने या सबंध शहरावर, इथल्या पुढच्या-पुढच्या पिढ्यांवर कला-साहित्य-संगीताचे अक्षरश: संस्कार केलेले आहेत. इतिहासाला अर्थ देण्याचं आणि उन्हातल्या वर्तमानाच्या माथ्यावर छत उभं करण्याचं काम नेहमी लेखणीनेच केलेलं आहे. लेखणीला दुसरा पर्याय असू शकत नाही. ज्ञानेश्वरांना आठवा, किंवा तुकारामांना डोळ्यांसमोर येऊ द्या; म्हणजे लेखणीचं मोल लक्षात येऊ शकेल. दैनंदिन आयुष्यात आपल्या रोजच्या भोवतालातली, आपल्या निकटची माणसं रोजच्या रोज भरडली जात असतात त्याचं कोणाला सोयरसुतक दिसत नाही. बोलण्यासाठी घरात कुणीही उपलब्ध नसल्याने पैसे मोजून नाती विकत घ्यावी लागतात हे महाराष्ट्राच्या तथाकथित सांस्कृतिक राजधानीतलंच नव्हे तर गावोगाव सगळीकडेच दिसू लागलेलं वास्तव आहे.

पुरस्कार प्राप्त रचना सत्काराला उत्तर देताना म्हणाल्या की, मला अमर हबीब व दगडू लोमटे यांचा अभिमान आहे. डॉ शैला लोहिया यांचं नांव फार मोठे आहे मला हा पुरस्कार मिळाला हे माझं भाग्य आहे. माझ्या माहेरच्या लोकांनी घेतलेली ही दखल सदैव आठवणीत राहील. लिखानाची सुरवात २०१३ साली केली. मानवलोक मधील महिलांच्या मुलाखती घेऊन जो लेख लिहला तो माझा पहिला लेख ज्या नावाने पुरस्कार मिळतोय त्या नावाची उंची वाढवण्याची शक्ती मला मिळावी हीच अपेक्षा.

या वेळी प्रास्ताविक करते वेळी स्वागत अध्यक्ष सुदर्शन रापतवार म्हणाले की, १९९८ पासून अंबाजोगाई मध्ये साहित्य सम्मेलन सुरू झाले. लोकाश्रया वर चालणारे हे साहित्य सम्मेलन सुरू असून याच्या यशस्विते साठी सभासद शुल्क व्यतिरिक्त कोणाकडून ही पैसे जमा केले जात नाहीत. सम्मेलन यशस्वी ते साठी विविध स्पर्धा, कार्यशाळा आयोजित केल्या. साहित्य सम्मेलना मध्ये आगळ्या वेगळ्या विषयावर परिसंवाद होणार आहे.

या प्रसंगी आयोजित जागर दिंडीचे उद्घाटन डॉ. बी. आय. खडकभावी पूर्व स्वागताध्यक्ष यांच्या हस्ते झाले. ही जागर दिंडी छ. शिवाजी महाराज चौक येथून निघून आद्यकवी मुकुंदराज सभागृहात आली यात सहभागी विद्यार्थ्यांनी कार्यक्रम स्थळी उपस्थित जेष्ठ नागरिकांचा पुष्प देऊन सन्मान केला या जागर दिंडीसाठी सुनील व्यवहारे, ॲड. अनंत जगतकर, लक्ष्मण गोरे, कैलास चोले, नामदेव मुंडे, विष्णु सरवदे यांनी पुढाकार घेतला.

या प्रसंगी ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे मार्गदर्शक प्राचार्य कमलाकर कांबळे, जेष्ठ पत्रकार अमर हबीब, तिलोत्तमा पतकराव यांच्या सह उपाध्यक्ष सुभाष बाहेती, वंदना तेलंग, सचिव प्रा. पंडीत कराड, सहसचिवः विष्णू सरवदे, कोषाध्यक्ष गोरख शेंद्रे, व्यासपीठ नियोजन प्रमुख विजय रापतवार, सांस्कृतिक कार्य प्रमुखः सुनील व्यवहारे, प्रसिद्धी प्रमुखः आशरब पठाण, सदस्य दत्ता अंबेकर, चंद्रकला देशमुख, सुजाता भोजने, ॲड. जयंत भारजकर, विशाल जगताप यांच्या सह मसापचे दगडू लोमटे (अध्यक्ष), डॉ. राहुल धाकडे (उपाध्यक्ष), गोरख शेंद्रे (सचिव), प्रा.डॉ. शैलजा बरुरे (कोषाध्यक्ष), प्रा. विष्णु कावळे (सहसचिव), अमृत महाजन, प्रा.डॉ. देविदास खोडेवाड, रेखा देशमुख, निशा चौसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरवात दिवंगत साहित्यिकांना श्रद्धांजली व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक दगडू लोमटे (अध्यक्ष, मसाप) यांनी तर सूत्र संचालन अभिजित जोंधळे यांनी केले. या प्रसंगी अंबाजोगाई सह बाहेरून आलेले साहित्यिक, कवी व नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



आज पाटोदा येथे अर्जुन पुरस्कार सन्मानित पै.राहुल(नाना)आवारे यांची पुणे डिव्हिजन येथे सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP)या पदी पदोन्नती झाल्याबद्दल नगराध्यक्षांच्या निवासस्थानी स्वागत करताना लोकप्रिय नगराध्यक्षराजूभैयाजाधव अँड महेशजी बेंदरे, ह.भ .प .तांबे महाराज, श्री जय जाधव श्री सोनवणे साहेब, श्री टकले साहेब, श्री घुगे साहेब, श्री सुरज भैय्या बोबडे, शुभेच्छा दिल्या याप्रसंगी मित्रपरिवार उपस्थित होते.

# खालापुरीत विहिरीत पाय घसरून पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**खालापुरी । प्रतिनिधी**

**शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी येथे शनिवारी दुपारच्या सुमारास विहिरीत शेळीचे पडलेले पिल्लू काढण्यासाठी गेलेल्या भगवान मोहन परजणे वय वर्ष ६८ या शेतकऱ्याचा पाय घसरून पडल्याने मृत्यू झाला याप्रकरणी शिरूर कासार पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद झाली आहे.**



येथील अत्यंत मनमिळावू असलेले शेतकरी भगवान मोहन परजणे हे काल शेळ्या चारत असताना विहिरीजवळ गेलेले शेळीचे पिल्लू विहिरीत पडले ते काढण्यासाठी विहिरीत उतरले त्या पिलाला बाहेर काढत असताना त्यांचा पाय घसरला पाण्याने गच्च भरलेल्या विहिरीत त्यांना पोहता येत नसल्यामुळे व आजूबाजूला कोणीच नसल्याने त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला मृतदेह पार तळाला गेल्याने रात्री उशिरा त्यांचा मृत्यू बाहेर काढला काल रविवार रोजी त्यांच्यावर मोठ्या लोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे याप्रकरणी शिरूर कासार पोलीस ठाण्यामध्ये बप्पासाहेब परजणे यांच्या तक्रारीवरून आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे या घटनेमुळे या परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पान ६ वरून...

## स्वामी विवेकानंद शाळेत

अध्यक्ष म्हणून माननीय श्री. संतोष दादा कुलकर्णी (अध्यक्ष- न. ब. सं. अंबाजोगाई )श्रीमती स्वरूपाताई दिग्रसकर ( सचिव- न. ब. सं. अंबाजोगाई तसेच मुख्याध्यापिका स्वा. वि. बा. वि. मं. अंबाजोगाई.) तसेच प्रमुख अतिथी म्हणून सैनिक मा. श्री विशाल राठोड सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व पाहुण्यांच्या रीतसर स्वागताने करण्यात आली. या मुलाखत कार्यक्रमाचा उद्देश आदरणीय श्री.संतोष दादा यांनी आपल्या समर्पक शब्दांत मांडत लष्करी शिक्षण व शिस्तीची जाणीव मुलांना करून दिली. कार्यक्रम प्रसंगी आदरणीय श्री. विशाल राठोड सरांची मुलाखत शाळेतील सहशिक्षिका आदरणीय श्रीम. प्रज्ञाताई यांनी घेत मुलांचे कुतूहल जागृत केले तसेच मुलांनीही आपले जिज्ञासापूर्वक प्रश्न विचारले. मुलांच्या प्रश्नांना उत्तरे देत असताना आदरणीय सैनिक श्री राठोड सरांनी आपला जीवन परिचय तसेच आपले शालेय माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण याविषयी माहिती करून दिली व आपल्या शिक्षणातील एनसीसी चे महत्व मुलांना सांगितले. त्याचबरोबर भारतीय लष्कराची माहिती,लष्करातील सैनिकांच्या विविध तुकड्या व त्यांची कामे, अनेक राज्यांतील सैनिकांचे एकमेकांशी असणारे संबंध यांविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीची विद्यार्थिनी कु. ऐश्वर्या गडदे तसेच इयत्ता सातवीचा विद्यार्थी चिरंजीव मिहीर देशपांडे यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेच्या सहशिक्षिका श्रीमती अंकिता ताई यांनी केले. अशाप्रकारे स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर अंबाजोगाई येथे मुलाखतीचा कार्यक्रम अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## बाळराजे पवारांच्या

साहित्यांचे वाटप, अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहेत तर सर्व कार्यक्रमास मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार, सौ गिताभाभी बाळराजे पवार ,शिवराज पवार उपस्थित राहणार आहेत तरी मतदारसंघातील सर्वांनी आरोग्य शिबीरात सहभाग घ्यावेत असे संयोजन समितीच्या वतिने आव्हान करण्यात आले होते.

## शेतकऱ्याचा मुलगा केंद्रीय

भाग आहे. सीमा सुरक्षा दल शांतिकालात गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार भारताच्या जमिनीवरील सीमांचे रक्षण करते. सीआयएसएफ भारतातील सर्वात महत्त्वाच्या पायाभूत सुविधा जसे अणु प्रतिष्ठान, अंतराळ अस्थापना, विमानतळ, बंदरे, वीज प्रकल्प इत्यादींना संरक्षण देते. या दलात बीडच्या धारूर तालुक्यातील ग्रामीण भागात असलेल्या जवळा येथील युवकाने प्रचंड मेहनत घेत या दलात नियुक्ती मिळवली.

नुकताच एसएससी जीडी (डींरषष िशश्रशलींळेप लेााळीीळेप ऋशपशीरश्र ऊीं) या परिक्षेचा अंतिम निकाल १३ डिसेंबर २०२४ रोजी जाहीर करण्यात आला. या निवड यादीत दत्ताचे नाव पाहुन साबळे कुटुंबाचा आनंद गगनात मावेनासा झाला. दत्ताचे वडील तुकाराम साबळे शेतकरी तर आई गवळणबाई गृहिणी आहेत. लहान बहिण भाऊ व दत्ताच्या शालेय शिक्षणाचा भार अतिशय हलाखीच्या परिस्थितीत आई-वडिल पेलत आहेत. दत्ताने मिळवलेल्या या यशामुळे आई-वडिलांच्या कष्टाचे चीज झाले असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शहर पोलीस निरीक्षकांना

निवडणुकीत अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील घाटनांदूर येथे ईव्हीएम मशीनची तोडफोड झाली आणि या गुन्ह्याचा तपास शहर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकास दिल्या गेल्याची खात्रीलायक माहिती आहे मग वरिष्ठ अधिकाऱ्यांचा ग्रामीण पोलीस निरीक्षकावर विश्वास नाही की अन्य काही विषय आहे. एकूणच या ग्रामीण पोलीस निरीक्षक महोदयांना कसलाही ताण तणाव दिसून येत नाही व त्यामुळे ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत सर्व काही अवैध धंदे जोमाने सुरू आहेत. मटका आणि गुटख्याने तर कहरच केला आहे. ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दी मधील हे सर्व अवैध धंदे कोणाच्या कृपा आशीर्वादाने सुरू आहेत हे न समजण्या एवढे दुध खुळे सुजाण नागरिक नाहींत. आणि सर्व काही आलबेल सुरू असताना सतत रडणारे हे महोदय चक्क म्हणतात इथं काहीच नाही हो, उगीच वरून टाकलं म्हणून ड्युटी करत आहे. मी तर बदली कधी होते याची वाट पाहतोय त्यांच्या तोंडून वारंवार निघणारे हे वक्तव्य म्हणजे नैराश्य दाखवणारे असले तरी हे नैराश्य नौ सो चुहे खाकर बिल्ली हज को चली असे असुन पोलीस स्टेशन हद्दीत सर्व अवैध धंदे आलबेल चालू ठेऊन हे पोलीस निरीक्षक मात्र भोपळ्यात बी खुशाल आहेत हे सत्य नाकारून चालत नाही.

# संविधानप्रेमी निरपराध सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्युची सिआयडीमार्फत चौकशी करा-समस्त शिव,फुले, शाहु, आंबेडकर अनुयायींची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

दिनांक १० डिसेंबर रोजी परभणी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संविधान शिल्पाची जातीयव्देश पसरविण्याचा उद्देश समोर ठेवून तोडफोड केली त्याचा परिणाम परभणी शहरातील संविधान प्रेमी यूवक आक्रमक झाल्याने कांही युवकांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते त्यातच सोमनाथ सुर्यवंशी या युवकाचा कारागृहात मृत्यु झाल्याची धक्कादायक घटना घडली असुन या घटनेचा निषेध व्यक्त करत दिनांक १६ डिसेंबर रोजी अवघ महाराष्ट्र बंद ची हाक डॉ बाबासाहेब आंबेडकर अनुयायांनी दिली आहे. तरि माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी शांततेचे सहकार्य करावे असे आवाहन शिव शाहु फुले आंबेडकर अनुयायी माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

परभणी येथील न्यायालयीन कोठडीत असलेल्या तरुणाचा कारागृहात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे मृत तरुणाचे नाव सोमनाथ सूर्यवंशी वय ३५ वर्ष असे असून त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकारामुळे परभणी शहरात पुन्हा तणावाचे वातावरण निर्माण झाले असून घटनेची



गंभीर दखल घेत नांदेड परिक्षेत्राचे आयजी शाहजी उमाप पुन्हा परभणीत दाखल झाले आहेत. सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याबाबत सध्या काहीही स्पष्ट नाही. या तरुणाचे न्यायाधीशांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात येणार आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होईल, असे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.परभणी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यानंतर पुकारण्यात आलेल्या बंद आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. आंदोलकांचा मोठा जमाव, दगडफेक, जाळपोळ, पोलिसांचा आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज, जमावबंदी, इंटरनेट सेवा बंद अशा ताणलेल्या घटनांनंतर जवळपास ५० जणांना ताब्यात घेण्यात आले होते. या प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एकाचा कारागृहातच मृत्यू झाल्याची बातमी समोर आली आहे. सोमनाथ सुर्यवंशी असे त्या ३५ वर्षीय मृत तरुणाचे नाव आहे. कारागृहातच या तरुणाचा मृत्यू झाल्याने शहरात पुन्हा अस्वस्थता व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.परभणीत झालेल्या दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एका तरुणाचा कारागहातच मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, सोमनाथ सुर्यवंशी असे ३५ वर्षीय मयत तरुणाचे नाव असून जिल्हा सामान्य रुग्णालयात आणल्यानंतर डॉक्टरांनी त्या तरुणास मृत घोषित केले. या घटनेने परभणीत पुन्हा एकदा तणावाचं वातावरण निर्माण झालंय. याच अनुषंगाने माजलगाव बंदची हाक आंबेडकरी जनतेच्या वतीने देण्यात आलेली आहे या आशयाचे निवेदन पोलीस प्रशासनाला समस्त शिव फूले शाहु आंबेडकरी अनुयायी व कार्यकर्त्यांनी माजलगाव शहर पोलीस स्टेशनला दिले आहे या बंदमध्ये सर्वपक्षीय सर्व संघटना सहभागी होणार असून हा बंद शांततेत पाळण्यात यावा व सर्व व्यापारी बांधवांनी या बंदला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# होम हवन , पूर्णाहुती व देवीच्या पालखी मिरवणुकीने श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष महोत्सवाची सांगता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान व अंबाजोगाईचे ग्रामदैवत असलेल्या श्री योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत संपन्न झाला. रविवार दि १५ रोजी श्री योगेश्वरी देवीची यात्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या यात्रेत हजारो भक्तांचा महापूर उसळल्याचे चित्र मंदिर परिसरात दिसून आले. सकाळी होमहवन, पूर्णाहुती व सायंकाळी देवीच्या पालखी मिरवणुकीने या मार्गशीर्ष सोहळ्याची सांगता करण्यात आली. तहसीलदार विलास तरंगे व सौ मयुरी तरंगे यांनी योगेश्वरी देवीची विधीवत होमहवन व महापूजा करून पूर्णाहुती देण्यात आली. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता श्री योगेश्वरी देवीची पालखी मिरवणूक अंबाजोगाई शहरातून काढण्यात आली. यावेळी श्री योगेश्वरी देवल कमिटीचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे यांच्यासह उपाध्यक्ष राजकिशोर



मोदी, सचिव प्रा. अशोक लोमटे, सहसचिव संजय भोसले, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, सतीश लोमटे, प्रवीण दामा, डॉ संध्या जाधव, अमोल लोमटे हंसराज देशमुख, राजपाल भोसले, यांच्यासह देवल कमिटीचे संपूर्ण सदस्य यांच्यासोबतच हजारो आराधी, तथा योगेश्वरी देवीचे भक्त मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

यावर्षी मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदीर परिसरात सलग नऊ दिवस ५ ते ६ हजार आराध मंडळ परंपरागत पध्दतीने बसल्या होते. शहर वासियांनी योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा केल्या होत्या. या वेळी झालेल्या महापूजेला तहसीलदार तथा देवल कमिटी चे अध्यक्ष विलास तरंगे,व सौ. मयुरी तरंगे यांनी विधिवत होमहवन, योगेश्वरी देवीची महापूजा करून पूर्णाहुती दिली. याप्रसंगी योगेश्वरी देवीचे पुजारी, पुरोहित,मानकरी व भक्त उपस्थित होते. महोत्सवाच्या कालावधीत सलग नऊ

### श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष यात्रेत उसळला भक्तांचा महापूर

### मंदिरात हजारो भक्तांनी देवीच्या दर्शनासाठी रांगा लावून दर्शनाचा लाभ घेतला

दिवस विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन देवल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

मंदिरात आराध बसलेल्या सर्व महिलांच्या निवासाची, पाण्याची व त्यांना मूलभूत गरजा पुरवण्यासाठी देवल कमिटीच्या वतीने उपाययोजना आखण्यात आली होती. मंदिरात बसणाऱ्या सर्व आराध मंडळाच्या सकाळच्या नाश्ता ( फराळ), दुपारचे जेवण त्याचबरोबर संध्याकाळी फराळ अशी भोजनाची व्यवस्था देखील मंदिर प्रशासनाकडून केली गेली होती. या वर्षी मंदिरात बसणाऱ्या प्रत्येकाची नावनोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्यात आली होती. त्यामुळे मंदिर परिसरात किती आराध बसले आहेत याची माहिती मंदिर प्रशासनाकडे असल्याने त्यांची संपूर्ण व्यवस्था मंदिर प्रशासनाकडून करण्यास सोयीस्कर गेल्याचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे , उपाध्यक्ष राजकिशोर मोदी तथा सचिव प्रा.अशोक लोमटे यांनी याप्रसंगी सांगितले. रविवारी दि १५ रोजी सायंकाळी पाच वाजता श्री योगेश्वरी देवीची पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. या पालखी मिरवणूकीत हजारावर आराधी,वाघ्या, मुरळी आपल्या हालगी,झाज , तसेच संबळ या वाद्यांसाह पालखी सोबत होते. याप्रसंगी आई राजा उदो उदो , सदानंदीचा उदो उदो अशा प्रकारचा श्री योगेश्वरी देवीचा जयघोष या पालखी मिरवणुकीत केला जात होता. श्री योगेश्वरी देवीच्या पालखी मार्गावर जागोजागी रांगोळी, व विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

# राज्यातील २६ कारखाने अद्यापही आहेत बंदच !

पुणे : गेल्या वर्षीच्या अवर्षण स्थितीचा फटका यंदाच्या गळीत हंगामाला बसत आहे. राज्याचा गळीत हंगाम सुरू होऊन महिन्याचा कालावधी झाला आहे. गेल्या हंगामाच्या तुलनेत यंदा २६ साखर कारखान्यांची धुराडी अद्याप पेटलेली नाहीत.

हंगाम सुरू न झालेले बहुतांशी साखर कारखाने सोलापूर व अहिल्यानगर विभागांतील आहेत. गेल्या वर्षी ऊस लागवडीच्या काळात पाणीटंचाई असल्याने याचा परिणाम उसाची लागवड घटण्यावर झाला. यामुळे काही भागांत उसाची कमतरता आहे. यातच साखरेच्या दराअभावी आर्थिक नियोजन बसत नसल्याने अनेक कारखान्यांना अद्याप यंदाचा हंगाम सुरू करता आला नाही. पहिल्या महिन्यात साखर उत्पादनाची साखर



उत्पादनाची इतर राज्यांच्या तुलनेत कमी राहिली. यंदा ११ डिसेंबर अखेर राज्यातील १८१ कारखान्यांनी गाळप सुरू केले आहे. गेल्या वर्षी २०७ कारखान्यांनी उसाचे गाळप सुरू केले होते. ९३ सहकारी, तर ८८ खासगी साखर कारखान्यांनी यंदाचा हंगाम सुरू केला आहे. निवडणुकीच्या धामधुमीमुळे साखर कारखानदारांनी परवाने मिळूनही निकालानंतरच कारखाने सुरू केले.

अनेक कारखान्यांच्या यंत्रणा निवडणुकांत व्यग्र असल्याने बहुतांशी कारखान्यांना नियोजन करता आले नाही. कारखान्यांची तोडणीची घडी बसेपर्यंत नोव्हेंबर संपल्याचे काही कारखानदार प्रतिनिधींनी सांगितले. राज्यात सर्वाधिक साखर कारखाने असणाऱ्या सोलापूर विभागात (सोलापूर, धाराशीव) ३९ कारखाने सुरू झाले आहेत. गेल्या वर्षी या विभागात ५० कारखाने सुरू होते. सोलापूर विभागात उसाची टंचाई असल्याने व प्रामुख्याने खोडवा पिकाचे प्रमाण जास्त असल्याने विभागातील गाळप फार गती घेत नसल्याची स्थिती आहे.

# तुरीचे उत्पादन वाढवण्यासाठी असे उपाय करा

तूर हे भारतातील एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. हे पीक सलग किंवा मुख्यत: आंतरपीक म्हणून इतर पिकात घेतले जाते. परंतु अनेकदा या पिकाच्या उत्पादनात घट येते. तूर पिकामध्ये वेळोवेळी काही गोष्टींचा अवलंब केल्यास उत्पादनात वाढ करता येते.



तूर पिकाच्या ओळींमध्ये खांडण्या : दोन झाडांतील अंतरानुसार मजुरांद्वारे खांडण्या भरणे आवश्यक आहे. काही ठिकाणी डोबणी २-३ वेळा करून खांडण्या बुजवणे आवश्यक आहे.

निंदणी : ट्रॅक्टर किंवा बैलजोडीने पेरणी केलेल्या तूर पिकाची निंदणी वेळीच करणे आवश्यक आहे. सोयाबीनसोबत आंतरपीक असल्यास सोडओळ (पट्टापेर) पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.


शेंडे छाटणे : पीक २५ ते ३० दिवसांचे असताना शेंडे छाटून घ्यावेत. अलीकडे शेंडे छाटण्याची सुरक्षित अशी छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. छाटणी केल्यानंतर बुरशीनाशकाची फवारणी करणे आवश्यक आहे.

पाणी व्यवस्थापन : शेवरा अवस्थेपूर्वी आणि शेंगांमध्ये दाणे भरताना ओलीत करणे आवश्यक आहे. जमिनीत मुबलक ओल असल्यासच शेंडे छाटणे आवश्यक आहे.

रोग आणि किडींचे नियंत्रण : शेवरा अवस्थेच्या सुरुवातीला, फुलोरा अवस्थेच्या सुरुवातीला आणि शेंगांमध्ये दाणे भरताना योग्य कीटकनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे.

इतर महत्त्वाच्या गोष्टी : सलग तूर लागवडीसाठी जोडओळ पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. बीटी कपाशी आणि तूर यांच्यातील आंतरपीक पद्धतीमध्ये दोन्ही पिकांची जोडओळ पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खते आणि सूक्ष्मसंजीवके देणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून काढणी करणे आवश्यक आहे. या गोष्टींचा अवलंब केल्याने तुम्हाला तुमच्या तूर पिकाचे उत्पादन निश्चितच वाढवता येईल.

# फळांच्या सालीपासून इंधन निर्मिती



फळ खाऊन झाल्यावर त्याची साल कचरा म्हणून फेकून देण्यात येते. मात्र या सालीपासून विश्वेश्वरय्या राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्थेच्या (व्हीएनआयटीत) केमिकल इंजिनिअरिंगच्या प्राध्यापकांनी 'बायोब्युटॅनॉल' तयार केले आहे. या 'बायोब्युटॅनॉल'चा उपयोग इंधनात 'इथेनॉल'ला पर्याय म्हणून केल्यावर होणारे प्रदूषण टाळता येणे शक्य होणार आहे.

साधारणतः गाडीच्या इंजिनमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा वापर होतो. त्यातून सल्फर डायऑक्साइड आणि ट्राय ऑक्साइड, याशिवाय नायट्रोजन डायऑक्साइड बाहेर पडते. त्यामुळे वातावरण प्रदूषित होते. ही बाब लक्षात घेऊन व्हीएनआयटीतील केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. कैलास वासेवार, डॉ. दिवाकर शेंडे, डॉ. कल्याणी मोटघरे यांच्या निदर्शनास आली.

त्यांनी कचऱ्यातून तयार होणारे 'बायोब्युटॅनॉल'चा वापर इंधनात करून त्यापासून वातावरणातील प्रदूषण कमी करण्यासाठी संशोधनास सुरू केली. या वेळी संशोधनातून 'बायोब्युटॅनॉल'चा इंधनात वापर केल्यास असे प्रदूषण निर्माण करणारे वायू बाहेर पडत नाहीत. विशेष म्हणजे सहज उपलब्ध होणारा फळांच्या सालीचा कचरा, एक शाश्वत आणि किफायतशीर पर्याय असून त्यामुळे ऊर्जा क्षेत्रासाठी फायदा होणार आहे. तसेच टाकाऊ पदार्थांपासून एक शाश्वत उत्पादन स्रोत निर्मिती होऊन शेतकरी आणि कृषी-उद्योगांसाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

काय आहे 'बायोब्युटॅनॉल' : 'बायोब्युटॅनॉल' एक जैवइंधन असून त्याच्या ऊर्जा कार्यक्षमतेसाठी आणि विद्यमान इंजिनासह सुसंगततेसाठी ओळखले जाते. हे परंपरेने मका किंवा ऊस यांसारख्या अन्न पिकांपासून तयार केले जाते. फळांच्या साली सहजपणे उपलब्ध होतात. या सालींवर प्रक्रिया केल्यावर त्यातून 'बायोब्युटोनॉल' हे इंधन मिळते.

गाडीच्या इंजिनाची वाढणार क्षमता : डाळिंबाच्या सालीचा वापर करून तयार करण्यात आलेल्या 'बायोब्युटॅनॉल' हे इथेनॉलपेक्षा चांगले असून पेट्रोल आणि डिझेलमध्ये त्याचा वापर केल्यास इंजिनची क्षमताही वाढण्यास मदत होत असल्याचे संशोधनात समोर आले आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून केलेले संशोधन हे त्यांना संधी निर्माण करणारे आहे. या संशोधनातून शाश्वत विकासाच्या दृष्टीने एक पाऊल असून, वायू प्रदूषणासारखी मोठी समस्या दूर करण्यासाठी महत्त्वाचे ठरणारे आहे.

# काळी मका ठरतेय शेतकऱ्यांच्या फायद्याची

भारतातील देशी मक्यावरील अनेक वर्षांच्या संशोधनानंतर छिंदवाडा येथील कृषी संशोधन केंद्रात काळ्या म्हणजेच रंगीत मक्याचे संशोधन करण्यात आले आहे. काळ्या मक्याची खास गोष्ट म्हणजे त्यात जस्त, तांबे आणि लोहाचे प्रमाण चांगले असते. जे कुपोषणाशी लढण्यासाठी प्रभावी ठरते. कृषी शास्त्रज्ञांनी मक्याची ही नवीन जात जवाहर मका १०१४ विकसित केली आहे.

मका लागवड ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. बेबी कॉर्न आणि स्वीट कॉर्नची मका लागवड देशभरात केली जाते. झैद हंगामातील पिकांच्या पेरणीत शेतकरी चांगल्या उत्पन्नासाठी काळ्या मक्याची लागवड करू शकतात. या पिकाचे वैशिष्ट्य म्हणजे ते तयार होण्यासाठी केवळ ९० ते ९५ दिवस लागतात आणि त्याचे उत्पादनही इतर पिकांच्या तुलनेत जास्त आहे. भारतात काळ्या मक्याच्या एका कणसाची किंमत सुमारे २०० रुपये आहे.

काळ्या मक्याची खासियत : भारतातील देशी मक्यावरील अनेक वर्षांच्या संशोधनानंतर छिंदवाडा येथील कृषी संशोधन केंद्रात काळ्या म्हणजेच रंगीत मक्याचे संशोधन करण्यात आले आहे. काळ्या मक्याची खास गोष्ट म्हणजे त्यात जस्त, तांबे आणि लोहाचे प्रमाण चांगले असते. जे कुपोषणाशी लढण्यासाठी प्रभावी ठरते. कृषी



शास्त्रज्ञांनी मक्याची ही नवीन जात जवाहर मका १०१४ विकसित केली आहे. काळे कॉर्न हेल्दी उत्पादनांमध्ये वापरले जाऊ शकते. ही मक्याची पहिली जात आहे. जी पौष्टिक आणि जैव-फोर्टिफाइड आहे. मक्याच्या दाण्यांचा रंग सामान्यतः पिवळा असतो. परंतु या नवीन प्रजातीचा रंग काळा, लाल आणि तपकिरी असतो.

काळ्या मक्याची लागवड : मक्याची ही नवीन जात पक्व होण्यासाठी ९५ ते ९७ दिवस लागतात. एकरी ८ किलो बियाणे लागवड करून शेतकरी २६ क्विंटलपर्यंत उत्पादन घेऊ शकतात. काळ्या मक्याचे तंतू वाढण्यास सुमारे ५० दिवस लागतात. काळ्या मक्याच्या लागवडीसाठी उष्ण हवामान योग्य मानले जाते. जेव्हा मका त्याच्या रोपामध्ये तयार होतो तेव्हा त्याला जास्त पाणी द्यावे लागते. मक्याच्या या जातीची लागवड ओळींमध्ये केली जाते. एका रोपापासून दुसऱ्या रोपापर्यंतचे अंतर सुमारे ६० ते ७५ सें.मी. काळी मका खोड रोगास सहनशील आहे. ही वाण पावसाच्या प्रदेशासाठी, विशेषतः पठारी भागात अतिशय योग्य आहे.काळ्या मक्यापासून मोठी कमाई : मंडईत पांढऱ्या आणि लाल मक्याचा सरासरी भाव २०५० ते २७०० रुपये प्रतिक्विंटल आहे. झैद हंगामात काळा मका पेरला जातो, तो तयार होण्यासाठी फक्त ९० ते ९५ दिवस लागतात. मक्याच्या या नवीन जातीमध्ये लोह, तांबे आणि जस्त मुबलक प्रमाणात आढळतात, जे कुपोषणाशी लढण्यास मदत करतात. काळ्या मक्याचा शेंगा बाजारात महागड्या किमतीत उपलब्ध आहे, ऑनलाइन वेबसाइट्सवर एका मक्याची किंमत २०० रुपये आहे. काळ्या मक्याचा भाव नेहमीच सामान्य मक्यापेक्षा जास्त असतो. भारतात फार कमी शेतकरी काळ्या मक्याची लागवड करतात.




## जागतिक दिवस
## बांगला देशचा स्वातंत्र्यदिन
## भारतीय विजय दिवस

### महत्वाच्या घटना

१४९७ : वास्को-द-गामाने केप ऑफ गुड होपला वळसा घातला.
१७०७ : ला जपान च्या माउंट फुजी या पर्वतावर या दिवशी शेवटचा ज्वालामुखी उद्रेक झाला होता.
१७७३ : अमेरिकन राज्यक्रांती बॉस्टन टी पार्टी
१८५४ : भारतातील पहिल्या इंजिनीअरिंग कॉलेजची स्थापना पुणे येथे झाली.
१९०३ : मुंबईतील ताजमहाल पॅलेस हॉटेल ग्राहकांसाठी खुले करण्यात आले.
१९२८ : मुंबई-पुणे रेल्वे वाहतूक बोगद्यातून सुरु झाली.
१९३२ : 'प्रभात'चा 'मायामच्छिंद्र' हा चित्रपट प्रदर्शित झाला.
१९४५ : ला जपान चे दोन वेळा राहिलेले प्रधानमंत्री फ्युमिमारो कोनी यांनी आत्महत्या केली होती.
१९४६ : थायलँडचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९५१ : ला हैदराबाद चे सालार जंग संग्रहालयाची स्थापना.
१९७१ : भारत - पाक युद्ध, पाक सैन्याची शरणागती, बांगलादेशची निर्मिती
१९८५ : कल्पक्कम येथील 'इंदिरा गांधी अणूसंशोधन केंद्रातील प्रायोगिक 'फास्ट ब्रीडर रिॲक्टर' राष्ट्राला समर्पित.
१९९१ : पुर्वीच्या सोविएत संघराज्यातून फुटून कझाकस्तान हा स्वतंत्र देश झाला.
१९९३ : ला दिल्लीला सर्वांसाठी शिक्षण हे चर्चासत्र पार पडले.
२००६ : अंतराळवीर सुनिता विल्यम यांनी एका सोबत्यासोबत अंतराळयानाच्या बाहेर जाऊन ७ तास ३१ मिनिटात विद्युत प्रणालीची दुरुस्ती केली.
२०१४ : ला पाकिस्तान च्या पेशावर येथे दहशदवादी हल्ल्यात १५० लोकांचा जीव गेला होता त्यामध्ये १३४ लहान मुले होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९६० : चिंतामण गणेश कर्वे - मराठी कोशकार व लेखक, महाराष्ट्र शब्दकोश, महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश, शास्त्रीय परिभाषा कोश यांचे संपादक (जन्म: ४ फेब्रुवारी १८९३)
१९६५ : डब्ल्यू. सॉमरसेट मॉम - इंग्लिश लेखक व नाटककार (जन्म: २५ जानेवारी १८७४)
१९८० : कर्नल सँडर्स - 'केंटुकी फ्राईड चिकन'चे संस्थापक (जन्म: ९ सप्टेंबर १८९०)
२००४ : लक्ष्मीकांत बेर्डे - अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९५४)
२००२ : ला भारतीय अभिनेत्री कव्वाल शकीला बानो यांचे निधन.
२००२ : सर्कस सम्राट काशिनाथ सखाराम तथा बंडोपंत देवल निधन.
२००४ : लक्ष्मीकांत बेर्डे - अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९५४)
२०१३ : ला भारतीय क्रिकेटर मधुसूदन रेगे यांचे निधन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७४९ : छत्रपती शाहू महाराज (जन्म: १८ मे १६८२)
१८५० : स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधानमंत्री आणि पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे निधन. (जन्म: ३१ ऑक्टोबर १८७५)
१८७८ : बेकिंग पावडरचे शोधक आल्फ्रेड बर्ड यांचे निधन.
१९५० : सरदार वल्लभभाई पटेल स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व पहिले गृहमंत्री, भारताचे लोहपुरुष, भारतरत्न (मरणोत्तर १९९१) (जन्म: ३१ आक्टोबर १८७५)
१९५२ : ला स्वातंत्र्य सैनिक पोट्टि श्रीरामुलु यांचे निधन.
१९६६ : वॉल्ट इलायन डिस्ने ॲनिमेशनपटांचे प्रणेते, 'मिकी माऊस'चे जनक (जन्म: ५ डिसेंबर १९०१)
१९८५ : शिवसागर रामगुलाम मॉरिशसचे पहिले प्रधानमंत्री (जन्म: १८ सप्टेंबर १९००)
२००० : प्रसिद्ध लेखक तसेच पत्रकार गौर किशोर घोष यांचे निधन.
२०१३ : लोकसभेचे सदस्य सीस राम ओला यांचे निधन.
२०१३ : इंडिअन आयडल च्या दुसऱ्या सीजन चे विजेते संदीप आचार्य यांचे निधन.

# हरभरा पिकातील घाटे अळीचे एकात्मिक व्यवस्थापन

हरभरा हे रब्बी हंगामातील प्रमुख पीक आहे. या पिकात घाटे अळी या किडीच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट येत आहे. पिकाच्या सुरुवातीच्या काळात या किडीचा प्रादुर्भाव कमी असला तरी पुढे फुलोरा आणि घाटे लागण्याच्या अवस्थेत त्यात मोठी वाढ होते. घाटे अळीमुळे ३० ते ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. या बहूभक्षी किडीला नियंत्रणात ठेवण्यासाठी सुरुवातीपासूनच एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

पतंग : मजबूत बांध्याचा, फिकट विटकरी-पिवळसर रंगाचा असून, त्याच्या समोरील पंखांवर गडद ठिपका दिसतो. मागील पंख फिकट विटकरी रंगाचा असून त्यावर काळ्या रंगाची कडा दिसते.

अंडी : प्रौढ मादी कीड कोवळ्या शेंड्यांवर, पानांवर, तसेच कळ्यांवर आणि फुलांवर एकेक करून ३०० ते ५०० अंडी घालते. अंडी गोलसर, हिरवट-पिवळसर असून खसखशीच्या दाण्यासारखी दिसतात. अंडी उबण्याचा कालावधी ५ ते ७ दिवसांचा असतो.

अळी : अंड्यातून बाहेर पडलेल्या अळीची पूर्ण वाढ होण्यासाठी १४ ते १५ दिवस लागतात. पूर्ण विकसित घाटे अळी पोपटी रंगाची असली तरी पिकानुसार यात विविध रंगछटाही दिसतात. शरीराच्या बाजूला तुटक करड्या रेषा आढळतात. पूर्ण वाढलेली अळी ३० ते ५० मि.मी लांब असते. कोषावस्थेत जाण्यापूर्वी अळीची भूक १ ते २ दिवस मंदावते.

कोष : अळी झाडाच्या किंवा मुळांच्या आसपास जमिनीत ४ ते ५ सेमी खोलीवर मातीचे वेष्टण तयार करून त्यात कोषावस्थेत जाते. कोष तांबड्या रंगाचा असून १.५ ते २ से.मी. लांब असतो. कोषावस्थेत कीड एक आठवडा ते महिनाभर राहते. अशा प्रकारे किडीचा जीवनक्रम २५ ते ५२ दिवसांत पूर्ण होतो. ही कीड एका वर्षात ७ ते ८ पिढ्या पूर्ण करते. रब्बी हंगामात



हरभरा पिकात या किडीच्या २ ते ३ पिढ्या पूर्ण होतात.

एकात्मिक कीड व्यवस्थापन : पेरणीसाठी कीड-प्रतिबंधक वाणांची निवड करावी. पिकाची पेरणी योग्य वेळी आणि योग्य अंतरावर करावी. हरभरा पेरताना त्यासोबत १०० ग्रॅम प्रति हेक्टर ज्वारीचे बियाणे मिसळून पेरावे. गहू, मोहरी, जवस, कोथिंबीर यांसारखी आंतरपिके घेतल्यास त्यावर मित्रकीटकांचे संवर्धन होते. घाटे अळीचा प्रादुर्भाव कमी राहण्यास मदत होते.

शेत तणमुक्त ठेवावे. शेताच्या बांधावरील कोळशी, रानभेंडी, पेटारी यांसारख्या किडींच्या पर्यायी खाद्य वनस्पती नष्ट कराव्यात. पेरणीसोबत ज्वारीची दाणे मिसळले नसतील, तर पक्ष्यांना बसण्यासाठी पिकापेक्षा १ ते १.५ फूट अधिक उंचीचे इंग्रजी 'टी' आकाराचे २० ते २५ पक्षी थांबे प्रति हेक्टरी उभारावेत. घाटे अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ ते ६ कामगंध सापळे (हेक्झाल्यूर) प्रति हेक्टरी जमिनीपासून १ मीटर उंचीवर लावावेत.मोठ्या अळ्या हाताने वेचून रॉकेल-मिश्रित पाण्यात टाकून त्यांचा नायनाट करावा. पीक कळी अवस्थेत व फुले येत असताना, ॲझाडिरॅक्टीन (३०० पी.पी.एम.) २ ते ३ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. प्रभावी नियंत्रणासाठी, घाटे अळी प्रथम व द्वितीय अवस्थेत असताना एचएएनपीव्ही (५०० एलई) १ मि.लि. अधिक नीळ पाच ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे सायंकाळी फवारणी करावी. कॅम्पोलेटीस क्लोरिडी या मित्रकिटकामुळे शाकीय अवस्थेत ५ ते ५० टक्क्यांपर्यंत घाटे अळीचे नियंत्रण होऊ शकते. शेत परिसरामध्ये या मित्र कीटकांची संख्या भरपूर असल्यास त्यांच्या संवर्धनासाठी वनस्पतीजन्य कीटकनाशके किंवा मित्र कीटकांसाठी सुरक्षित अशाच रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. घाटे अळीसाठी आर्थिक नुकसान मर्यादा - सरासरी २ अळ्या प्रति मीटर ओळ, ५ टक्के घाट्यांचे नुकसान, किंवा कामगंध सापळ्यात सलग २-३ दिवस ८-१० पतंग आढळल्यास.

रासायनिक फवारणी : शेतामध्ये वरील आर्थिक नुकसानीची मर्यादा ओलांडली गेल्यास पुढीलपैकी एका शिफारशीत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा. (फवारणी प्रमाण प्रति १० लिटर पाणी)

इमामेक्टीन बेंझोएट (०५ टक्के एस.जी.) ४.४ ग्रॅम किंवा क्लोरॲण्ट्रानिलिप्रोल (१८.५ टक्के एस.सी.) २.५ मि.लि. किंवा फ्लुबेंडायअमाइड (३९.३५ टक्के एस.सी.) २ मि.लि.किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (०५ टक्के ई.सी.) १२.५ मि.लि. किंवा फ्लुबेंडायअमाइड (२० टक्के डब्ल्यू.जी.) ५ ग्रॅम किंवा क्विनालफॉस (२५ टक्के ई.सी.) २० मि.लि. किंवा फ्लुबेंडायअमाइड (८.३३ टक्के) अधिक डेल्टामेथ्रिन (५.५६ टक्के एस.सी.) (संयुक्त कीडनाशक) ५ मि.लि. किंवा नोव्हॅल्युरॉन (५.२५ टक्के) अधिक इंडोक्साकार्ब (४.५ टक्के एस.सी.) (संयुक्त कीडनाशक) १६.५ मि.लि.

नुकसानीचे स्वरूप :पीक ३ आठवड्यांचे झाल्यानंतर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येतो. लहान अळ्या सुरुवातीला पानांची खालची बाजू कुरतडून खातात, त्यामुळे पानांवर पांढरट डाग दिसतात. कोवळे शेंडेदेखील कुरतडून खातात, त्यामुळे पीक शेंडेविरहित दिसते. पुढील टप्प्यात, म्हणजेच फुलोऱ्याच्या आणि घाटे लागण्याच्या अवस्थेत प्रादुर्भाव वाढतो. अळ्या कळ्या व फुले खातात. घाटे लागल्यानंतर अळी घाट्यावरील आवरण कुरतडत गोलाकार ३ ते ५ मि.मी. व्यासाचे छिद्र करते. डोक्याचा अर्धा भाग घाट्यात खुपसून आतील दाणे खाऊन घाटे पोखरते. एक अळी साधारणतः ३० ते ४० घाट्यांचे नुकसान करते. काबुली हरभऱ्यावर देशी वाणांपेक्षा अधिक प्रादुर्भाव आढळतो. पिकाच्या सुरुवातीपासूनच एकात्मिक कीड नियंत्रण पद्धती न अवलंबल्यास पिकाचे ५ ते ३८ टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते.

# अखेर अनाधिकृत बॅनर प्रकरणी बीड नगरपालिकेकडुन

# २१ जणांविरोधात गुन्हा दाखल





बीड । प्रतिनिधी

बीड शहरात राजकीय नेते, कार्यकर्ते, व्यावसायिक आदिंनी आपापल्या वेगवेगळ्या जाहिरातीचे अनाधिकृत बॅनर लावून सुंदर शहराला विद्रूप केले होते.तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात लावण्यात आलेल्या बॅनर मुळे वाहतुकीस अडथळा व अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. याविरोधात शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी सहका-यांसमवेत दि.२ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने केली होती. मागील काही वर्षांपासून शहरात विनापरवाना बॅनर लावण्याचा पायंडाच पडला होता. नेत्यांच्या निवडी, शहरात स्वागत ,उत्सव, वाढदिवस आदी कार्यक्रमांच्या शुभेच्छांचे बॅनर लावले जात होते. अनाधिकृत बॅनर हटवावेत यासाठी सामाजिक कार्यकर्ते वारंवार निवेदने आणि आंदोलनाच्या माध्यमातून नगरपालिका प्रशासनाकडे कारवाईची मागणी करत होते.परंतु ठोस कारवाई करण्यात येत नसे

## कारवाईत सातत्य हवे : डॉ.गणेश ढवळे

> आवाहन करून बॅनर जप्तीची कारवाई करूनही पुन्हा अनाधिकृत बॅनर लावणारांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या :- निता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड

आंदोलनानंतर बॅनर काढण्याचे नाटक करण्यात येई आणि दुस-या दिवशी पुन्हा बॅनर लावलेले दिसत असत.अखेर नगर पालिकेने कठोर पावले उचलत दि.१२ गुरूवार रोजी एकाच दिवशी ३ पोलिस ठाण्यात तब्बल २१ जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्वच्छता निरीक्षक शशिकांत जोगदंड यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सुदर्शन सुभाष बांगर,उमेश शहादेव फड,यादव चव्हाण, संकेत जाधव,सुमित उजगरे, जालिंदर हिरवे,दिपक चांदणे यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

सुनिल काळकुटे यांच्या फिर्यादीवरून पेठ बीड पोलिस ठाण्यात संकेत जाधव,रोहन गायकवाड, विलास जोगदंड यांच्या विरोधात तर भागवत जाधव यांच्या फिर्यादीवरून संकेत जाधव,दत्ता पगळ,अक्षय चांदणे, सुमित उजगरे,पंकज खुपसे,अक्षय चांदणे,अजय सुरवसे, राहुल इंगळे, जालिंदर हिरवे,दीपक चांदणे बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विना परवाना बॅनर लाऊ नये असे आवाहन करण्यात आले होते.पहिल्यांदा बॅनर जप्तीची कारवाई करण्यात आली होती.परंतु त्यानंतरही काही लोकांनी विना परवाना बॅनर लाऊन शहराचे विद्रुपीकरण करणे सुरूच ठेवले होते.त्यामुळे सर्व स्वच्छता निरीक्षकांना सुचना करून गुन्हे दाखल करण्याच्या सुचना दिल्या.नागरीकांनी सहकार्य करावे असे आवाहन निता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांनी केले आहे. राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांना आवाहन करण्यात येत असुन निदान छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतूकीस अडथळा असणारे व अपघाताला निमंत्रण ठरणारे बॅनर लाऊ नयेत तशा सुचना सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना द्याव्यात असे आवाहन डॉ.गणेश ढवळे यांनी केले असुन बीड नगर परिषदेनेही कोणताही दुजाभाव न करता कारवाईत सातत्य ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## चोरांचा मोर्चा शेतकऱ्यांच्या पिकांकडे

### मुळुकवाडी येथे रात्रीतून ७४ कट्टे सोयाबीन चोरीला



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात चोरट्यांनी आता आपला मोर्चा शेतीमालाकडे वळवला असुन शेतातील कांदा पिक अथवा सोयाबीन रात्रीतुन चोरीला जाण्याचे प्रमाणात वाढ झाली असुन अगोदरच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.त्यातच महावितरणच्या खंडीत वीजपुरवठ्यामुळे चोरांचे साधत असुन याबद्दल तिव्र नाराजी शेतकऱ्यांमध्ये दिसुन येते.शेतातील पिक चोरी जाण्याबरोबरच घरासमोरील सोयाबीन चोरीला नेण्याचे धाडस चोरट्यांनी दाखवत पोलिस प्रशासनाला आव्हान दिले आहे.

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील अहमदपूर ते अहिल्यादेवी नगर राष्ट्रीय महामार्गावरील शिवाजी रंगनाथ ढास आणि रामदास रंगनाथ ढास यांचे घरासमोरील सोयाबीनचे ७४ कट्टे रात्री चोरट्यांनी लंपास केले असुन एकुण जवळपास पावणे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. चोरट्यांनी महामार्गावरून सोयाबीन कट्टे न नेता घराच्या मागच्या बाजूला असलेल्या ज्वारीच्या शेतातुन डोक्यावर वाहुन पाठीमागे पिक अप मध्ये टाकुन लंपास केले आहे. पहाटे साडेतीन वाजता शिवाजी ढास लघवीला बाहेर आल्यानंतर त्यांना सोयाबीनचे कट्टे चोरीला गेल्याचे कळाले. त्यांचा मुलगा कैलास ढास यांनी पहाटे ४ वाजता नेकनुर पोलिस स्टेशन येथे जाऊन कल्पना दिली.तेव्हा त्यांच्या सांगण्यावरून पेट्रोलिंगची गाडी विचारपूस करून गेली.व सकाळी १० वाजता लेखी तक्रार देण्यासाठी नेकनुर पोलिस स्टेशनला बोलावले असल्याचे कैलास शिवाजी ढास यांनी सांगितले. महावितरणच्या खंडीत वीजपुरवठ्यामुळे चोरीच्या घटना वाढल्या असल्याचे खंडु कदम, अमोल पितळे, कैलास ढास यांनी सांगितले. मूळुकवाडी गावात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असुन गेल्या ४ दिवसांपासून वीजपुरवठा नाही.घराच्या दारात सोयाबीन ठेवलेल्या ठिकाणी मोठा फोकस आहे.परंतु रात्री वीज नसल्याने चोरट्यांचे साधले. महावितरणच्या गलथान कारभारामुळे चोरीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे खंडु ढास, अमोल पितळे, कैलास ढास यांनी सांगितले.

## अखेर ‘त्या‘ चौकाचे भाग्य उजळले; कार्यकर्ता संघटनेने मानले आभार

### महात्मा गांधी चौक नाव देण्याची केली मागणी





बीड । प्रतिनिधी

शहरातील जिल्हा कारागृहामागे तसेच माने कॉम्प्लेक्स समोरील चौकाचे भाग्य उजळले असून या चौकाला महात्मा गांधी चौक नाव द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता संघटनेकडून करण्यात आली आहे. या चौकात काही वर्षांपूर्वी महात्मा गांधींचा संदेश देणाऱ्या तीन माकडांची प्रतिकृती बसविण्यात आली होती. साधारण चार वर्षांपूर्वी अज्ञात इसमाने या तीन पैकी एका माकडाची प्रतिकृती तोडून टाकली होती. ही बाब मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी याविषयी प्रसिद्धी माध्यमाद्वारे जिल्हा प्रशासन आणि बीड नगर परिषदेला उद्देशून नासधूस करण्यात आलेल्या माकडाची नवीन प्रतिकृती पूर्ववत बसवावी अशी मागणी केली होती तसेच 'बुरा मत देखो, बुरा मत सुनो, बुरा मत कहो' असा महात्मा गांधीजींचा मोलाचा संदेश देणाऱ्या या चौकातील माकडांची नवीन प्रतिकृती पूर्ववत बसवून येथे मर्क्युरी लाइट्स लावण्यात यावे.

सीसीटीव्ही कॅमेरे लावावे आणि या चौकाला महात्मा गांधी चौक असे नाव देण्यात यावे याकरिता सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, माजी सैनिक अशोक येडे, शेख युनूस, शेख सादिक, आजम खान, रामधन जमाले, ज्येष्ठ नागरिक कोळेकर साहेब, शेख मुबीन, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि या प्रश्नाकडे लेखणीच्या माध्यमातून लक्ष वेधणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी लागोपाठ दोन वर्ष महात्मा गांधी यांच्या २ ऑक्टोबर या जयंती दिनी या चौकात लक्षवेधी आंदोलन ही केले होते. याची दखल घेऊन तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी या चौकात माकडांच्या नवीन प्रतिकृतीसह सीसीटीव्ही कॅमेरे, पथदिवे लावण्यात यावे असे बीड नगर परिषद मुख्याधिकारी यांना आदेशित केले होते. याची दखल घेऊन विद्यमान मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी तातडीने पाऊल उचलले आणि नासधूस करण्यात आलेल्या माकडांच्या प्रतिकृती हटवून महात्मा गांधीजींच्या जयंतीदिनी म्हणजेच ०२ ऑक्टोबर २०२४ रोजी माकडांच्या नवीन प्रतिकृती बसविल्या. त्यानंतर सीसीटीव्ही कॅमेरेही लावले आणि नुकतेच आता सोलार प्लेट तसेच पथदिवे ही लावल्याने या चौकाचे सुशोभीकरण चांगले झाले आहे. आता फक्त या चौकाला शासन-प्रशासन दरबारी महात्मा गांधी चौक असे नाव द्यायचे बाकी आहे. एवढे एक कार्य बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनाने केले की हा चौक परिपूर्ण होईल. तसेच या चौकाची ओळखही महात्मा गांधी चौक म्हणून होईल. याकरिता आता ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ हे सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे या चौकात पाहणी केल्यानंतर दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे. शिवाय उशिराने का होईना बीड नगर परिषद च्या विद्यमान मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी या चौकाचे सुशोभीकरण केल्याने तसेच तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी याकरिता आदेशित केले होते म्हणून दोन्ही महिला अधिकाऱ्यांचे हृदयी आभार सुद्धा व्यक्त केले आहे.

## नवीन १४ प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी निधी उपलब्ध करुन द्या

### केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधवांकडे कुंडलिक खांडेंची मागणी

बीड । प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र हे ग्रामीण भागातील अत्यंत महत्त्वपूर्ण व संवेदनशिल म्हणून ओळखले जाते. ग्रामीण भागातील लहान मोठ्या घातपातापासून तर अपघातांतील रुग्णांसह तालुक्यातील दैनंदिन ओपीडीसाठी येणार्या रुग्णांना या ठिकाणी तत्पर सेवा मिळणे गरजेचे आहे.बीड जिल्ह्यातील जनतेचे आरोग्य अधिकाधिक सुरक्षीत करण्याच्या हेतुने सध्या कार्यरत असणार्या आरोग्य उपकेंद्रांच्या संख्येत वाढ होणे गरजेचे आहे. त्यासाठी नवीन १४ आरोग्य उपकेंद्रे स्थापण्याची आवश्यकता आहे. या उपकेंद्रांच्या उभारणीसाठी प्रत्येकी १२५ लक्ष रु.ची आवश्यकता आहे. एकूण १४ उपकेंद्रांसाठी एकूण १७५० लक्ष



रु.मंजुर करावेत अशी मागणी सरपंच,उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेवून मागणी केली आहे.या प्रसंगी ना.जाधव यांनी खांडे यांनी दिलेल्या निवेदनाबद्दल आश्वस्त करताना लवकरच बीड जिल्ह्यातील नवीन १४ उपकेंद्रांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र हे भारतातील आरोग्यसेवेच्या उतरंडीतील सर्वात खालचे एकक आहे देशातील दूरवरच्या भागातील मनुष्यवस्तीपर्यंत किमान आरोग्य सुविधा पोचविण्याच्या उद्देशाने भारतातील मध्यवर्ती सरकारच्या धोरणानुसार.प्राथमिक आरोग्य केंद्रांचे जाळे विणण्यात आले आहे. नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेत सरपंच, उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी एका निवेदनाव्दारे बीड जिल्ह्यात नवीन १४ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांची मागणी करत त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी केली आहे. स्थानिक उद्भवणार्या आजरांवर नियंत्रण मिळवणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, महत्त्वपूर्ण आकडेवारी गोळा करणे तसेच रेफरल व प्रयोग शाळेच्या सेवा पुरवणे इ. कार्य प्राथमिक आरोग्य केंद्र पार पाडते. त्यामुळे बीड जिल्ह्यात नवीन १४ आरोग्य उपकेंद्रे स्थापण्याची आवश्यकता आहे. या उपकेंद्रांच्या उभारणीसाठी प्रत्येकी १२५ लक्ष रु.ची आवश्यकता आहे. एकूण १४ उपकेंद्रांसाठी एकूण १७५० लक्ष रु.मंजुर करावेत अशी मागणी सरपंच,उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेवून मागणी केली आहे.

## बीडच्या १२ खेळाडूंची शालेय राष्ट्रीय रग्बी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

बीड । प्रतिनिधी

पुणे येथे ९ ते १२ डिसेंबर रोजी १४,१७ आणि १९ वर्ष शालेय राज्यस्तरीय रग्बी स्पर्धा संपन्न झाल्या. बीड मधील मोरया क्रीडा मंडळ येथे सराव करणाऱ्या खेळाडूंचा राज्यस्तरीय १४ वर्षाखालील मुली गटात बीडच्या संघाने ब्राँझ मेडल (तृतीय क्रमांक)मिळवला आहे. त्याच बरोबर १४,१७ आणि १९ वर्षा खालील तिन्ही मुले गटात सिल्व्हर मेडल (व्दितीय क्रमांक) मिळवला. या कामगिरीच्या आधारे राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात बीडच्या १२ खेळाडूंची निवड झाली. १९ वर्ष खालील गटात यश बालासाहेब जाधव, सुरज बालासाहेब येवले, ओंकार मनोजकुमार मोरे आणि आकाश भास्कर खांडे ,१९ वर्ष मुली गटात दिपाली दिलीप ताठे तसेच १७ वर्ष गटात वेदांत गोरख डावकर, ऋषभ बापू शिंदे, सार्थक कुमार पवार आणि आदित्य ऋषिकांत तांदळे या भालचंद्र विद्यालय लिंबागणेश येथे शिक्षण घेणाऱ्या खेळाडूंची निवड झाली. १४ वर्ष गटात आर्यन नितीन येळवे, तसेच नंदिनी दिनेश मुळुक या श्री शिवाजी विद्यालय बीडच्या खेळाडूची निवड झाली आहे. तसेच १७ वर्ष मुली गटात अदिती सखाराम लोंढे या गोरक्षनाथ विद्यालय ढेकणमोहाच्या खेळाडूची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे.हे सर्व खेळाडू रोज सायंकाळी ६ ते ८.३० पर्यंत मोरया क्रीडा मंडळ, तुळजाई चौक,कॅनॉल रोड, नाट्यगृह जवळ मंडळाच्या मैदानावर वर्षभर सराव करतात. मोरया क्रीडा मंडळ बीडचे संस्थापक अध्यक्ष, राष्ट्रीय रग्बी प्रशिक्षक तसेच बीड जिल्हा रग्बी मुख्य प्रशिक्षक श्री नितीन येळवे , कारागृह पोलीस तसेच रग्बी प्रशिक्षक शोएब खाटीक,तसेच अशोक चौरे सर (सचिव,मोरया क्रीडा मंडळ) यांनी या खेळाडूची निवड महाराष्ट्र संघात निवड झाल्या बद्दल अभिनंदन केले. तसेच या कामगिरी बद्दल बीड जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष इसाक शेख ,सचिव श्री महेश घुले, उपाध्यक्ष रमेश सानप, कोषाध्यक्ष श्री हरिभाऊ बांगर ,कार्याध्यक्ष नितीन येळवे सर, कारागृह पोलीस तसेच प्रशिक्षक शोएब खाटीक ,प्रशिक्षक अशोक चौरे सर, मार्गदर्शन भगवानराव बागलाने,श्री बालासाहेब जाधव सरपंच लिंबागानेश, श्री शिवराज देवगुडे साहेब, प्रशांत मुळे सर , रघुनाथ मुंडे ,सतीश तकिक, अदनान शेख, राष्ट्रीय रग्बी खेळाडू सूरज येडे, राज्य खेळाडू तसेच राष्ट्रीय पंच संभाजी गिरे इतर सर्व पदाधिकारी आणि समस्त मोरया क्रीडा मंडळ परिवार बीड आदींनी शुभेच्छा दिल्या.

## रानडुकरांच्या धुमाकुळाने शेतकरी त्रस्त

### प्रशासनाने बंदोबस्त करावा -राऊत

शिरूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्वाधिक कपाशीची लागवड करणारा शिरुर तालुक्यात ऑगस्ट-सप्टेबंर महिन्यातील अति पावसाने खरिप हंगामी लागवड असणारे कपाशी,सोयाबिन,व तुर पीकांचे अधिकचे नुकसान झाल्याने व पर्जन्यमान व परतीच्या पावसामुळे तालुक्यातील रब्बी हं.पीकांची लागवड क्षेत्रात वाढ होऊन ज्वारी, भूईमुग, मका, कांदा, हरभरा, असी पीक क्षेत्रात लागवड आहे. पीक देखील जोमात आहेत.परंतु अनेक शेतक-यांच्या पीकांची नासाडी होत आहे.



थंडीचे प्रमाण वाढल्याने व रानडुकरांचा धुमाकुळ अधिक होऊन उभ्या ज्वारीचे मधुनच टुकडे पाडणे, कणसे चघळणे, भूईमुग उकरणे, हरभरा उपकरणे, मक्याची नासधुस करण्याचे प्रतिदिन प्रमाण वाढल्याने शेतकरी हैराण आहेत. त्यासाठी शेतकरी विविध उपाययोजना करत आहेत परंतु रानडुकरांचा प्रादुर्भाव कमी होत नसल्याने दुसाट्याची पीके वाया जात आहेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल होऊ लागल्याने प्रशासनाने यावर उपाय योजना करण्याची शेतकरी वर्गातून मागणी वाढत आहे.तसेच या पुर्वी देखील शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अध्यक्ष यांनी मा.कृषिमंत्री श्री.धनंजय मुंडे यांची भेट घेऊन शेतक-यांच्या पीकांचे रानडुकरे,हरणे,व इतर प्राण्यापासुन संरक्षण करण्यासाठि अनुदानित सौरकुंपन,अथवा काटेरी कुंपण योजना राबवण्यासाठी विनंती केली होती.या नंतरच्या काळात देखील कृषिमंडळ या मागणीचा पाठपुरावा करून शेतक-यांच्या पीक संरक्षण करण्यासाठी तसेच चंदन,औषधी वनस्पती व इतर पीके नुकसान पातळी कमी होण्यासाठी प्रयत्न करणार आहे.तरी रब्बी हंगामी पीके धोक्यात आहेत परंतू या रांडुकरामुळे शेतक-यांवर देखील जीवितास धोका निर्माण होत आहे.शेतक-यांवर रात्रीचे राखणी करण्याचा त्रास वाढला आहे.रात्रीच्यावेळी शेतक-यांना समुहानेच फिरावे लागत आहे.अनेक ठिकाणी तात्पुरती तार लाऊन विद्युत करंट सोडण्याचे प्रमाण वाढल्याने देखील अपघाताचे प्रमाण वाढत आहे.करिता शेतकरी व त्यांचे रब्बी हंगामी पीके वाचवण्यासाठी प्रशासनाने डुकरांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे.असे शिवराम राऊत यांनी कळवले आहे.

## शिवसेना जिल्हाप्रमुख मुळूक, गलधर यांनी केले देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन

### स्व.संतोष देशमुख कुटुंबीयांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत : मुळूक, गलधर

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत निर्दयीपणे हत्या केल्याची दुर्दैवी घटना चार दिवसांपूर्वी घडली. या घटनेचे बीड जिल्ह्यातच नाही तर राज्यभर पडसाद उमटले. जिल्ह्यातील जनतेने या घटनेचा तीव्र निषेध केला. दरम्यान शनिवारी (दि.१४) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. देशमुख कुटुंबियांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगून जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर



यांनी देशमुख कुटुंबियांचे सांत्वन केले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे सोमवारी दुपारी अपहरण करुन हत्या करण्यात आली. घटनेनंतर देशमुख यांच्या हत्येचे जिल्हयात तीव्र पडसाद उमटले. या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी नऊ तास रास्तारोको करण्यात आला. मानवी संवेदना हेलावून टाकणाऱ्या या घटनेचा विविध स्तरातून तीव्र निषेध करण्यात आला. दरम्यान शनिवारी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसैनिकांनी

मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांची भेट घेऊन देशमुख कुटुंबिया सोबत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगितले.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या खून प्रकरणाचा तपास सीआयडी मार्फत करावा अशी मागणी केली होती त्यानुसार या प्रकरणाचा तपास सीआयडी कडे देण्यात आला आहे स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात लक्ष घातल्याचे मुळुक यांनी यावेळी सांगितले. यावेळी केज युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, शहर प्रमुख बाळासाहेब पवार, युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, विकास काशीद केज तालुका सचिव, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, चंद्रकांत इंगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, युवासेना शहरप्रमुख आकाश चाळक, विभाग प्रमुख आकाश बहीर, शिवाजी गायकवाड, युवासेना उपतालुकाप्रमुख अजित गोरे, सरपंच बनसारोळा मनोहर गोरे सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## बबन महाराज मंझेरीकर यांचे कीर्तन

बीड : रामदास दशरथ यमपुरे यांच्या चौथ्या पुण्यतिथी निमित्त बीड तालुक्यातील उदंड वडगाव येथे बबन महाराज मंझेरीकर यांचे सोमवार दि.१६ डिसेंबर रोजी रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तन होणार आहे. त्यानंतर रात्री १० ते १२ या वेळेत खुळे महाराज यांचे भारूड होणार आहे.

उदंड वडगाव शिवाजीनगर येथे रामदास दशरथ यमपुरे यांच्या पुण्यतिथी निमित्त कीर्तन अन्? भारूडाचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करण्यात येत आहे. यंदा चौथ्या पुण्यतिथी निमित्त १६ डिसेंबर रोजी कीर्तन अन्? भारूड होणार आहे. तरी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन शहाजी रामदास यमपुरे, धनंजय रामदास यमपुरे, चंद्रकांत रामदास यमपुरे व समस्त यमपुरे परिवार यांनी केले आहे.

# आष्टी तालुक्यात सुरु असलेला अवैध वाळू उपसा बंद करण्याची मागणी

## सरपंच राधेश्याम धस यांच्या वाहनावर हायवा घालण्याचा प्रयत्न, आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात महसूल व पोलीस प्रशासनाच्या जाणिवपूर्वक दुर्लक्षामुळे वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असून त्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. अवैध वाळू वाहतूक करणारे भरधावपणे वाहने चालवत असून जामगाव येथील सरपंच राधेश्याम देविदास धस यांच्या वाहनावर हायवा चालकाने वाहन घालण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. या प्रकरणी राधेश्याम धस यांनी शुक्रवारी (ता. १३) आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

जामगाव येथे भरधाव वेगाने हायवा चालवणाऱ्या चालकाला धोकादायक पद्धतीने वाहन चालवू नको असे सांगितल्यामुळे अवैध वाहतूक करणाऱ्या हायवा चालकाने 'मी असेच वाहन चालवत असतो, तू आडवा येऊ नको, जीवाला मुकशील' असा दम दिला होता. राधेश्याम धस हे गुरुवारी (ता १२) सायं ६.३० वा सुमारास जामगाव ते आष्टा मार्गे जामगावकडे येत असताना भारत बेंझ कंपनीचा हायवा क्र. (एम एच-१६-उउ-५५ ८८) चालकाने राधेश्याम धस यांच्या वाहनावर हायवा घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. राधेश्याम धस यांनी त्यांचे वाहन रस्त्याच्या खाली उतरवल्यामुळे ते वाचले. ही घटना सतीश धस, अविनाश धस, संभाजी झांबरे त्यांनी समक्ष पाहिली. यावेळी या अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये आणखी एक अनोळखी इसम उपस्थित होता. याप्रकरणी हायवा चालक मन्सूर शेख याच्यावर आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आष्टी परिसरातील अनेक गावातील नदीमध्ये महसूल व पोलीस प्रशासनाच्या जाणिवपूर्वक दुर्लक्षामुळे अवैध वाळू उपसा राजरोसपणे सुरु असन त्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. अवैध वाळू उपसा बंद करण्यात यावा आणि त्या ठिकाणी असलेले वाळूचे साठे जप्त करण्यात यावेत अन्यथा शुक्रवार (ता. २०) पासून तहसील कार्यालया समोर आंदोलन करण्याचा इशारा रामहरी पांडुरंग धुमाळ, प्रशांत प्रकाश श्रीखंडे, श्रीपाद राजेंद्र बन, अमोल ज्ञानेश्वर बन, निखिल रंगनाथ धोंडे, आकाश दत्तात्रय ढेंगे, परीक्षित प्रदीप काकडे, संतोष बाळू पवार, अमोल पांडुरंग भोसले, वैभव बाबासाहेब सांगळे, निलेश नामदेव राऊत, महेश दासा रणसिंग यांनी निवेदनाद्वारे दिला.




नागपूर: कॅबिनेट मिनिस्टर नामदार पंकजा ताईसाहेब मुंडे यांना भेटून शुभेच्छा देताना भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, डीसीसी बँकेचे अध्यक्ष आदित्य सारडा ,जिल्हा परिषद मेंबर अशोक शेठ लोढा प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर आदी.

# वाल्मीक कराड यांच्या समर्थनार्थ रास्तारोको

दिंद्रुड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वाल्मीक कराड यांच्या वर दाखल झालेले खोटे गुन्हे वापस घ्या व मयत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना लवकरात लवकर अटक करून देशमुख कुटुंबाला न्याय देण्याच्या मागणीसाठी बीडच्या धारूर तालुक्यातील बीड परळी महामार्गावरील चाटगाव-संगम चौकात रास्ता रोको आंदोलन रविवारी सकाळी दहा ते साडे अकरा वाजेपर्यंत करण्यात आले. जवळपास ३०० ते ४०० ओबीसी समाजासह विविध जाती धर्माचे लोक या रास्ता रोको आंदोलनात होते .



## खोटे गुन्हे परत घेण्याची केली मागणी

जनसेवक वाल्मीक कराड यांना राजकीय द्वेषापोटी काही राजकीय मंडळींनी खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचे षडयंत्र रचले आहे.याच्या निषेधार्थ चाटगांव संगम देवदहिफळ कांदेवाडी खाडेवाडी येथील नागरिकांनी बीड परळी महामार्गावरील चाटगांव-संगम फाट्यावर रास्तारोको चे आंदोलन केले.दिड तास चाललेल्या या आंदोलनात शेकडो नागरिक सहभागी झाले होते.वाल्मिक कराड हे सर्व जाती धर्माच्या नागरिकांना समान न्याय देतात, अडिअडचणीला धाऊन जातात, बीड जिल्ह्यातील जनतेसाठी राबराबणार्या वाल्मीक कराड यांच्या विरोधात दाखल खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अन्यथा पुढील काही दिवसांत मोठे आंदोलन करण्यात येणार असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेत केज तालुक्यातील मस्साजोग येतील सरपंच संतोष देशमुख यांच्या खर्या मारेकर्यांचा शोध घ्यावा अशा भावना आंदोलकांनी व्यक्त केल्या.दिंद्रुड पोलीस स्टेशनचे ठाणेदार अण्णाराव खोडेवाड यांच्या मध्यस्थीने हे आंदोलन मागे घेण्यात आले.माऊली खाडे, भगवान कांदे, बळीराम डापकर, उत्तम कांदे, गोविंद कांदे, हनुमंत केकान , धर्मराज सांगळे, गोपाळ कांदे, पद्माकर मुंडे, बाबासाहेब बडे, गोरख सांगळे, सोमनाथ गोरे, विकास बडे, संदीप तिडके, विकास केकान यांच्यासह संगम-चाटगांव पंचक्रोशीतील ओबीसी समाज या प्रसंगी उपस्थित होता.

# शहर पोलीस निरीक्षकांना सर्वच ताण, ग्रामीण पोलीस निरीक्षक मात्र भोपळ्यात बी खुशाल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**एकीकडे अंबाजोगाई शहरात असलेल्या दोन पोलीस स्टेशन पैकी शहर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकास सर्वच प्रकारच्या ताण तणावाला सामोरे जावे लागत असताना दुसरीकडे मात्र ग्रामीण पोलीस हद्दीत सर्व काही धंदे आलबेल चालू ठेऊन या पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हे भोपळ्यात बी खुशाल आहेत.**

अंबाजोगाई शहर व ग्रामीण हद्दी मधील कायदा व सुव्यवस्था संभाळण्या साठी शहर व ग्रामीण असे दोन स्वतंत्र पोलीस स्टेशन असून शहर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकास सर्वच प्रकारच्या ताण तणावाला सामोरे जावे लागते. शहर पोलिसांना केवळ शहरात काहीही घडामोड होऊ द्या माहिती मिळताच घटनास्थळी धाव घ्यावी लागते असे नाही तर स्वा रा ती रुग्णालयात एम एल सी च्या माध्यमातून येणाऱ्या उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचा परस्थिती नुसार बंदोबस्त करावा लागतो, शहरात वेळोवेळी निघणारे मोर्चे, उपोषणे, धरणे, आंदोलने याला बंदोबस्त देऊन सामोरे जावे लागते. शहरात योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या व्ही आय पी लोकांना केवळ बंदोबस्तच करावा लागतो असे नाही तर या व्ही आय पी लोकांना सर्व सुविधा पुरवण्या पर्यंत लवाजमा करावा लागतो. शहरात वाहतूक समस्या हा तर दैनंदिन विषय असतो या समस्येला सामोरे जाण्यासाठी वाहतूक पोलिसा व्यतिरिक्त अन्य पोलीस बांधवानाही सामोरे जावे लागते. ग्रामीण भागातील असंख्य महाभाग शहरात येतात आणि नको ते उद्योग या ठिकाणी करतात पर्यायाने कायदा व सुव्यवस्थाचा प्रश्न निर्माण होतो आणि पोलिसांना धाव घ्यावी लागते, न्यायालयीन प्रक्रिये मुळे मेहरबान न्यायालयाचा आदेश आला की पोलिसांना तात्काळ धाव घ्यावी लागते. या सह अनेक प्रकाराच्या माध्यमातून शहर पोलीस आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या शहर पोलीस निरीक्षकावर कमालीचा ताण तणाव असतो हे मात्र स्पष्ट दिसते. दुसरी कडे मात्र अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मात्र भोपळ्यात बी खुशाल आहेत हे मात्र निश्चित. यांना ना कोणत्या मोर्चाला सामोरे जावे लागते ना आंदोलनाला, यांना ना न्यायालयाचा तणाव आहे ना रुग्णालयाचा तणाव आहे. कधी तरी घडणारा एखादा गंभीर गुन्हा वगळता गुन्ह्याचे प्रमाण अत्यल्प असते. परवाच झालेल्या विधानसभा

पान ३ वर

# स्वामी विवेकानंद शाळेत विद्यार्थ्यांनी घेतले लष्करी शिक्षण, स्वयंशिस्तीचे धडे

आंबजोगाई । प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर राधानगरी अंबाजोगाई येथे मुलांना सैन्याविषयी तसेच लष्करी शिक्षणाविषयी व स्वयंशिस्तीविषयी मार्गदर्शन करण्यासाठी आर्मी सैनिक माननीय श्री विशाल सर्जेराव राठोड यांची मुलाखत घेण्यात आली. माननीय श्री. विशाल सर्जेराव राठोड यांची नियुक्ती जी डी सोल्जर,११२ युनिट, इंजिनियर रेजिमेंट, मध्ये झालेली असून सध्या ते यूपी मथुरा या ठिकाणी कार्यरत आहेत.

**आर्मी सैनिक श्री. विशाल सर्जेराव राठोड यांची मुलाखत संपन्न**

या मुलाखत कार्यक्रम प्रसंगी

पान ३ वर



# शेतकऱ्याचा मुलगा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलात दाखल

## जवळा ग्रामस्थांनी केला भूमिपुत्राचा यथोचित सत्कार

भागवत साबळे । दिंद्रुड

धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथील दत्ता साबळे या शेतकऱ्याच्या मुलाची केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात नुकतीच निवड झाली. घरच्या हालाखीच्या परिस्थितीवर मात करत या तरुणाने मिळवलेले हे यश जवळा ग्रामस्थांसाठी अभिमानास्पद असल्याने त्यांनी दत्ताचा रविवारी सकाळी यथोचित सत्कार केला. भूमिपुत्राच्या या यशाचे गावकऱ्यांनी सद्गतीत कंठाने कौतुक केले.

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल भारताच्या केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचा

पान ३ वर



२०१९ ला दहावी परीक्षा उत्तीर्ण झालो. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शेतकरी आईवडिलांच्या हाल अपेष्टा संपवण्यासाठी मी प्रचंड मेहनत घेत होतो. सरकारी नोकरी मिळवायची हे ध्येय डोळ्यासमोर ठेवत दररोज पाच किमी अंतर केवळ वीस मिनिटात धावत पूर्ण करायचो. आता केंद्र स्तरीय नोकरी लागल्याने आई-वडिलांचा त्रास कमी होईल, लहान बहिण व भाऊ यांच्या उच्च शिक्षणासाठी मला काहीतरी करता येईल याचा अधिक आनंद आहे.

– दत्ता साबळे



वडवणी : मा.ना. पंकजाताई मुंडेसाहेब व धनंजय मुंडेसाहेब यांना महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल आनंद साजरा करताना माजी आ. केशवरावजी आंधळे, नगर पंचायत उपाध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, रुई पिंपळा,आदर्श सरपंच मयूर शेठ आंधळे, मधुकर धस सर, अशोक आंधळे, कल्याण राऊत, महादेव सावंत व इतर मान्यवर उपस्थित होते.



वडवणी : मा.ना. धनंजयजी मुंडे साहेब व मा. ना. पंकजाताई मुंडे साहेब यांची कॅबिनेट मंत्री पदी निवड झाल्याबद्दल वडवणी येथे फटाक्याची आतीशबाजी करताना व जेलोश करताना कोठारबनचे सरपंच रमेश काका मुंडे इतर कार्यकर्ते उपस्थित.



पाटोदा : लोकनेत्या नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे ताईसाहेब यांची आणि धनंजय मुंडे यांची कॅबिनेट मंत्री पदी निवड झाल्याबद्दल पाटोदा शहरात तोफा वाजवुण आनंद साजरा करण्यात आला. यावेळी सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंकजाताई मुंडे यांची कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याने भाजपा जिल्हा कार्यालयात आनंदोत्सव



बीड । प्रतिनिधी

नागपूर येथे झालेल्या महायुती शपथविधी कार्यक्रमा मध्ये पंकजाताई मुंडे यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर बीड जिल्हा भाजप कार्यालयात पेढे वाटून तसेच फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, दलित मोर्चा जिल्हा अध्यक्ष अजय सवाई, शिवाजी अप्पा मुंडे, संगीताताई धसे, गणेश पुजारी, संदीप उबाळे, भूषण पवार, बंटी फड, हरीश खाडे, दत्ता भाऊ थिगळे, बाबुराव परळकर, अनिल अमोल वडतिले, कपिल सौदा,केशव बडे,राजू शहाणे, अनंत नागरगोजे आदी उपस्थित होते.







This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

सोमवार, दि.१६ डिसेंबर २०२४ । पान ७

# सृजनशील समाजासाठी वाचन संस्कृती टिकणे महत्त्वाचे-देवेंद्र फडणवीस



**पुणे । प्रतिनिधी**

समाजातील सृजनशीलता कायम राहण्यासाठी वाचन संस्कृती जिवंत ठेवावी लागेल. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. त्यामुळे मराठी बोलणाऱ्यांची जबाबदारी वाढली आहे. विचारवंत, सजृनशील मूल्य जिवंत ठेवण्यासाठी वाचनसंस्कृती जतन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तसेच वाचनासाठी एक तास' हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येणार आहे. तसेच पुणे पुस्तक महोत्सवाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे (एनबीटी) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार चंद्रकांत पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, एनबीटी'चे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, संयोजक राजेश पांडे, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डीईएसच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रमोद रावत, सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टचे आचार्य पवन त्रिपाठी, ज्येष्ठ लेखिका डॉ. अरूणा ढेरे, लोकमान्य मल्टिपर्पज को. ऑप. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. सोमनाथ पाटील, उद्योजक विशाल चोरडिया, कृष्णकमार गोयल, प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, डॉ. संजय चाकणे, डॉ. आनंद काटीकर या वेळी उपस्थित होते. यावेळी एनबीटी'ला पुढील तीस वर्षांसाठी पुण्यात जागा उपलब्ध करून देण्याचे पत्र पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी दिले.

पुस्तक महोत्सवासाठी पुण्यापेक्षा उपयुक्त दुसरे शहर नाही, असे सांगून फडणवीस म्हणाले, ज्ञानाची दारे उघडून देणाऱ्या ग्रंथ संपदेचे डिजिटल युगात काय होणार असा प्रश्न पडत आहे. परंतु आज नवीन पिढी पुस्तके, ग्रंथ विकत घेत आहे, वाचत आहे हे आशादायी चित्र आहे. एआय' तंत्रज्ञानामुळे माहितीचे संकलन होऊ शकते, परंतु ग्रंथ आणि पुस्तकामुळेच सजृनशील समाज घडू शकतो. तंत्रज्ञानामुळे आपल्याला इतर भाषांतील अनुवादित पुस्तके वाचण्यासाठी सहज उपलब्ध होत आहेत, यामुळे ज्ञानाचे नवीन दालन या तंत्रज्ञानामुळे उघडले जात आहे.'

डॉ. अरुणा ढेरे यांनी महाराष्ट्राची वाङ्मयीन परंपरा पुढे जाणारा, सांस्कृतिक जाणिवा समृद्ध करणारा हा महोत्सव असल्याचे नमूद केले. मिलिंद मराठे यांनी गणेशोत्सव, सवाई गंधर्व महोत्सवाप्रमाणे आता पुणे पुस्तक महोत्सव ही ओळख निर्माण होत असल्याचे म्हटले. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी प्रास्ताविक केले.

### मी पुन्हा येईन.. मी पुन्हा येईन.

एकाच कार्यक्रमास दुसऱ्यांदा जाऊ नये,' असे भाजपचे ज्येष्ठ नेते प्रमोद महाजन हे म्हणायचे. दुसऱ्या वेळी कार्यक्रमास आल्यास मागच्या वर्षीचे भाषण केले, असे म्हणतील. नव्याने काही बोलल्यास यांना काही तत्व नाहीत, असे लोक म्हणतात. परंतु पुणे पुस्तक महोत्सव इतका चांगला आहे म्हणूनच मी दुसऱ्या वर्षी कार्यक्रमास आलो. यापुढेही या महोत्सवास दरवर्षी पुन्हा येईन..पुन्हा येईन,' अशी टिपण्णी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करताच कार्यक्रमस्थळी सर्वांनीच हसून दाद दिली.

# विशेष रेल्वे गाड्यांच्या १६ फेऱ्या वाढविल्या



पुणे । प्रतिनिधी

प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता मध्यरेल्वेकडून साईनगर शिर्डी-बिकानेर, हडपसर-हिसार, दौंड-अजमेर आणि सोलापूर-अजमेर या विशेष गाड्यांच्या कालावधीत वाढविण्यात आला आहे. या कालावधीत एकूण १६ फेऱ्या वाढविण्यात आल्याची माहिती पुणे रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

साईनगर शिर्डी-बिकानेर-साईनगर शिर्डी विशेष गाडीच्या चार फेऱ्या वाढविण्यात आल्या आहेत. गाडी क्र. ०४७१६ शिर्डी-बिकानेर ही दि. २२ आणि २९ डिसेंबरला धावेल. तर गाडी क्र. ०४७१५ बिकानेर-शिर्डी ही दि. २१ आणि २८ डिसेंबरला धावेल. हडपसर हिस्सार-हडपसर विशेष गाडीच्या चार फेऱ्या वाढविण्यात आल्या असून, गाडी क्र. ०४७२४ हडपसर-हिसार ही दि. २३ आणि ३० डिसेंबरला धावेल. तर गाडी क्र. ०४७२३ हिसार-हडपसर ही दि. २२ आणि २९ डिसेंबरला धावेल.

दौंड-अजमेर-दौंड साप्ताहिक विशेष गाडीच्या चार फेऱ्या होणार असून गाडी क्र. ०९६२६ दौंड-अजमेर ही दि. २० आणि २७ डिसेंबरला धावेल. तर गाडी क्र. ०९६२५ अजमेर-दौंड ही दि. १९ आणि २६ डिसेंबरला धावेल. सोलापूर-अजमेर-सोलापूर साप्ताहिक विशेष गाडीच्याही चार फेऱ्या वाढविल्या असून, गाडी क्र. ०९६२८ सोलापूर-अजमेर ही दि. १९ आणि २६ डिसेंबरला धावेल. तर गाडी क्र. ०९६२७ अजमेर-सोलापूर ही दि. १८ आणि २५ डिसेंबरला धावणार आहे. दरम्यान, या गाड्यांच्या थांब्यांमध्ये कोणताही बदल नाही, असे रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी रामपाल बड़पग्गा यांनी सांगितले.

# हवामानशास्त्रातील नवीन माहितीचा शेती आणि दैनंदिन जीवनातील उपयोगासाठी कार्यक्रमाचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

हवामानशास्त्रातील नवीन माहिती मिळवण्यासाठी आणि त्याचा शेती आणि रोजच्या जीवनातील उपयोगासाठी भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून पुण्यात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

येत्या २१ डिसेंबर रोजी म्हणजेच शनिवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात हवामानशास्त्राचा शेतीमध्ये कसा उपयोग करता येईल? शेतीसाठी मोबाईल ॲप्लिकेशन्स त्यासोबतच नवीन प्रकाशने आणि अहवालाचे प्रदर्शन देखील भरवण्यात येणार आहे. त्यासोबतच या कार्क्रमात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी, शेतकरी आणि धोरणकर्ते, संबंधित विज्ञानातील नवीन प्रगतीवर चर्चा करण्यासाठी एकत्र येणार आहेत.

कर्यक्रमाचे आयोजन भारतीय हवामानशास्त्र सोसायटी हवामानशास्त्र विभाग भारतीय उष्णदेशीय हवामान विज्ञान संस्था (खखढच्), प्रगत संगणन विकास केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चझघत राहुरी, कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे, भारतीय रिमोट सेन्सिंग सोसायटी पुणे शाखा आणि भारतीय भूगणितीय सोसायटी पुणे शाखा यांच्याकडून करण्यात आले आहे. तर पुण्यातील शिवाजीनगरच्या श्रीमाने हॉल,कृषी महाविद्यालयात हा कार्यक्रम पार पडणार आहे. तर या कार्यकर्मासाठी प्रवेश शुल्क २०० रुपये एवढा आकारण्यात येणार आहे. (कार्यक्रम स्थळी किंवा online भरता येईल ).

# जे. पी. श्रॉफ फाउंडेशनतर्फे आलोक काळे यांना पुरस्कार

**पुणे । प्रतिनिधी**

जे. पी. श्रॉफ फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा 'सस्टेनेबिलिटी क्रुसेडर पुरस्कार' यंदा पुण्यातील मॅग्नस व्हेंचर्सचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक असलेले उद्योजक आलोक काळे यांना जाहीर झाला आहे. 'सस्टेनेबिलिटी स्टार्ट-अप' या विभागामधील उत्कृष्ट कामामुळे काळे यांना हा पुरस्कार जाहीर झाला असून, २० डिसेंबर रोजी नारायण मूर्ती यांच्या हस्ते तो प्रदान करण्यात येणार आहे.

या वेळी पुरस्कार समितीचे अध्यक्ष व औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) माजी महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर, एमसीसीआयएच्या इलेक्ट्रॉनिक क्लस्टर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रदीप भार्गव, हनीवेलचे व्यवस्थापकीय संचालक आशिष गायकवाड, फाइव्ह एफचे अध्यक्ष गणेश नटराजन व जे. पी. श्रॉफ आदी मान्यवर उपस्थित असणार आहेत.काळे यांनी जगातील सर्वात कमी कार्बन फूटप्रिंट असलेल्या आयजीबीसी ग्रीनप्रो आणि जीआरआयएचएने प्रमाणित केलेल्या पर्यावरणपूरक उत्पादनांची निर्मिती करण्यासाठी अथक परिश्रम केले आहे. बांधकाम व्यवसाय क्षेत्रात कार्यरत असताना या क्षेत्राचा विकास अधिक शाश्वत करण्याबरोबरच शाश्वततेकडे आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यासाठी काळे हे गेली दहा वर्षे संशोधन विकासात काम करीत आहेत, त्यांच्या याच प्रयत्नांचा सन्मान म्हणून त्यांना यावर्षीच्या सस्टेनेबिलिटी क्रुसेडर पुरस्काराने गौरविण्यात येत आहे.

# पुणे पुस्तक महोत्सवात दुसरा विश्वविक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी एकाच लेखकाच्या अधिकाधिक पुस्तकांचे प्रदर्शन' या विष्यावर विश्वविक्रम झाला आहे. परमपूज्य जैन आचार्य विजयरत्न सुंदर सूरिश्र्वर महाराज यांनी ४८१ पुस्तके लिहिली आहेत. ही सर्व पुस्तके प्रसिद्ध आहेत. या पुस्तकांच्या सहाय्याने हा विश्वविक्रम करण्यात आला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर शनिवारपासून पुणे पुस्तक महोत्सवाला सुरुवात झाली. या महोत्सवात एकूण पाच विश्वविक्रम करण्यात येणार आहेत. यातीलच दुसरा विश्वविक्रम शनिवारी करण्यात आला,' अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.



पुणे पुस्तक महोत्सवात प्रसिद्ध लेखक आणि परमपूज्य जैन आचार्य विजयरत्न सुरीश्र्वर महाराज यांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या सहाय्याने गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्ड करण्यात आला आहे. पुस्तक महोत्सवाच्या एकाच लेखकाच्या अधिकाधिक पुस्तकांचे प्रदर्शन' अशा विषयाला अनुसरून हा विश्वविक्रम झाला आहे. आचार्य विजयरत्न सुंदर सूरिश्र्वर महाराज यांच्या वतीने सिद्धार्थ जैन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र स्वीकारले.

गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रशासनाने यंदा चार नवीन श्रेण्या खास पुणे पुस्तक महोत्सवासाठी तयार केल्या आहेत. त्यामुळे अधिकाधिक पुणेकरांनी उपस्थित राहून विश्वविक्रमाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन राजेश पांडे यांनी केले आहे.

# संविधान के सन्मान में पिंपरी चिंचवड डव्होकेट असोसिएशन वकील उतरे मैदान में

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी नेहरूनगर कोर्टात परभणी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधानाचा अवमान करणाऱ्या आरोपी आणि त्यामागील सूत्रधार यांना तात्काळ अटक करावी आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा . संविधान हे देशाचे सर्वोच्च स्थानी आहे त्यांचा अवमान करणाऱ्या व्यक्तिवर कडक कारवाई करावी तसेच देशाच्या संविधानाची विटंबना होणार नाही यासाठी अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे.परभणी येथे घडलेल्या घटनेचा काळी फित लावून जाहीर निषेध नोंदवण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने वकील वर्ग उपस्थित होते, परभणी येथे संविधानाचा अपमान करण्यात आला त्याचा निषेध करण्यासाठी दिनांक १४/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व वकील बंधू आणि



भगिनींच्या वतीने नेहरूनगर येथील न्यायालयात निषेध करण्यात आला यावेळी मा. अध्यक्ष ड.नाना रसाळ मा.अध्यक्ष ड.प्रमिला गाडे मा. अध्यक्ष ड.सुनिल कडुसकर मा.अध्यक्ष ड.किरण पवार मा.अध्यक्ष ड. सुदाम साने,मा. उपाध्यक्ष ड.प्रतीक जगताप मा. उपाध्यक्ष ड.गोरख कुंभार, जेष्ठ विधीज्ञ ड.बी.के.कांबळे , ड.नवीन वालेचा, ड.नारायणा थोरात, ड.तेजस चवरे ड.पल्लवी कुऱ्हाडे ड.प्रशांत भडकुंभे ड.सागर पोवार ड.मुस्तफिज शेख ड. राज जाधव ड. जितीन ठांनबीर ड. डॉ.अनिरुध्द गायकवाड ड. प्रताप साबळे ड. राज जाधव ड. एन एम गर्जे,ड. साक्षी जिरवनकर.

अध्यक्ष ड.पांडूरंग विठ्ठल शिनगारे उपाध्यक्ष ड. अजय रामसुमेर यादव, सचिव ड. संदिप भाऊसाहेब तापकीर, महिला सचिव ड. संगीता रमेश कुशलकर, सहसचिव ड. पदमावती लक्ष्मण पाटील , खजिनदार पदी ड. विशाल आसाराम पोळ , हिशोब तपासनीस ड. प्रेरणा हरेश चंदानी, सदस्य ड. विजय धोंडिराम भोंडे, ड. अक्षय कमलाकर चौधरी, ड. आरती दत्तात्रय कुलकर्णी, ड. पौर्णिमा भगवान मोहिते, ड. रूपाली रामचंद्र पवार , ड. सुषमा सुदर्शन पाटील उपस्थित होते यावेळी माजी अध्यक्ष नाना रसाळ यांनी महाराष्ट्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषांच्या पुतळ्यांची सुरक्षा आणि पावित्र जपण्याची जबाबदारी ही आपणा प्रत्येकाची आहे कारण या दोन महापुरुषांच्या पुतळ्यांची विटंबना करूनच महाराष्ट्रात जाणीवपूर्वक दंगली घडविण्याचा प्रयत्न केला जातो तरी सदर महापुरुषांच्या पुतळ्यांचे पावित्र्य व सुरक्षितता राखण्याचे काम हे शासनाचे तसेच प्रत्येक नागरिकाची व आपणा सर्वांची आहे


सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड विशाल पोळ यांनी केले तर आभार प्रदर्शन ड.संगिता रमेश कुशलकर यांनी केले

# रेल्वे रुळांवर कचरा टाकल्याने धोका

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे रेल्वे विभागातील काही रेल्वे रूळाजवळ वस्तीभाग असल्यामुळे येथील कचारा रूळाजवळच टाकला जातो. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकरता येत नाही. याबाबत रेल्वे प्रशासनाकडून वारंवार नागरिकांना जनजागृतीतून आवाहन केले जात आहे, मात्र कचरा कमी होत नाही. नागरिकांची एक चूक जीवावर बेतू शकते, त्यामुळे नागरिकांनी कचरा टाकू नये असे आवाहन यावेळी रेल्वे प्रशासनाने केले आहे.

पुणे रेल्वे विभागातील पुणे-मिरज-कोल्हापूर रेल्वेमार्ग हा मुंबई-पुणे-दक्षिणेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. हा मार्ग पुणे शहरालगत परिसरातून जातो. मात्र, घोरपडी-सासवड-फुरसुंगी दरम्यानच्या रेल्वे रुळाजवळ



सय्यदनगर, काळेपडळ, रामटेकडी आणि घोरपडी चाळ परिसरात राहणारे नागरिक रेल्वे रुळावर मोठ्या प्रमाणात कचरा टाकत आहेत. रेल्वे रुळाशेजारी कचरा टाकल्याने काही वेळा आगीच्या घटना घडू शकतात. तसेच कचरा टाकल्याने भटके जनावरे खाण्यासाठी येत असतात. त्यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रवाशांच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये, यासाठी कचरा टाकू नये, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले.

तेल टँकर, कोळसा आणि इतर ज्वलनशील वस्तूंची वाहतूक रेल्वेद्वारे केली जाते. रुळांलगत कचरा जाळला जात असल्याने याची झळ मालगाडीला बसल्यास मोठा धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना रेल्वे रुळावर, मार्गावर कचरा टाकून नये, असे आवाहन पुणे रेल्वे विभागाने केले आहे. यानंतरही कचरा टाकल्यास रेल्वे कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्याचा इशाराही रेल्वे प्रशासनाने केला आहे.

### संपूर्ण स्वच्छतेला प्राधान्य कधी?

मध्य रेल्वेने स्थानकांच्या स्वच्छतेसाठी कंत्राटदार नेमले आहेत. मात्र, रुळांलगत गटारातील कचरादेखील बऱ्याचदा वर काढून ठेवला आहे. पावसाळ्यात हाच कचरा वाहून पुन्हा गटारात जातो. त्यामुळे रेल्वे रुळांवर पाणी तुंबते. हा कचरा रुळांलगत न टाकता तेथून उचलून त्याची दुसऱ्या ठिकाणी विल्हेवाट लावण्याची आवश्यकता आहे.

# युवतींच्या हाती मोबाईलऐवजी चक्क लाठी काठी

शिक्रापूर । प्रतिनिधी

सध्या अनेक ठिकाणी युवतींबाबतच्या छेडछाडीच्या घटना वाढू लागल्या असल्याने युवतींच्या सुरक्षिततेची गरज निर्माण झाली आहे. हा दृष्टीकोन लक्षात ठेऊन संजय तांबे व मिलिंद ठोके या मित्रांनी अनोखा उपक्रम हाती घेत शिरुर तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालय मधील युवतींना मोफत लाठीकाठी व कराटे प्रशिक्षण उपक्रम सुरू केला आहे.

जातेगाव खुर्द (ता.शिरुर) येथील संजय तांबे या युवकाने किसान ऑल स्पोर्ट्स करिअर अकादमी सुरू केली असून त्या माध्यमातून मुलींच्या संरक्षणाची गरज ओळखून संजय तांबे व मिलिंद ठोके या दोघांनी शिरुर तालुक्यातील शाळा व महाविद्यालय येथे मुलींना मोफत लाठी काठी व कराटे प्रशिक्षण सुरू केल्याने शिरुर तालुक्यातील तब्बल तीन हजारहून अधिक युवती प्रशिक्षित झाल्या आहेत.

सध्या शिरुर तालुक्यातील सर्व शाळांमध्ये मुलींनी लाठी काठी प्रशिक्षण देण्यासाठी



किसान ऑल स्पोर्ट्स करिअर अकादमीचे सल्लागार संतोष दरेकर, भूषण घोलप हे विशेष प्रयत्न करत आहे. तर एकीकडे सध्या युवती मोबाईलमध्ये गुंतून राहत असताना त्यांच्या हाती मोबाईलऐवजी लाठी काठी देऊन युवतींना स्वसंरक्षणासाठी स्वतः पुढे येण्यासाठी स्वावलंबी बनवण्यासाठी संजय तांबे व मिलिंद ठोके या मित्रांनी सुरू केलेल्या अनोख्या उपक्रमाचे शिरुर तालुक्यातील कौतुक होत आहे.

**एक लाख मुलींना प्रशिक्षणाचा संकल्प . . .**

शिरुर तालुक्यातील सर्व शाळांतील मुलींना याबाबतचे प्रशिक्षक देऊन तब्बल एक लाख मुलींना स्वसंरक्षणार्थ लाठी काठी प्रशिक्षण देण्याचा आमचा संकल्प असल्याचे संजय तांबे यांनी सांगितले.

**मुली नक्कीच धाडसी होतील - तृप्ती देसाई**

सध्या मुलींवरील अन्याय अत्याचाराच्या घटना पाहता मुलींनी सक्षम होणे गरजेचे आहे, मुलींबाबत एखादी घटना घडल्यास त्यांनी कोणाची वाट न पाहता स्वतः प्रतिकार करण्याची गरज असताना संजय तांबे यांच्या या उपक्रमामुळे मुली नक्कीच धाडसी होतील आणि पुढील काळात सध्या होणाऱ्या घटना नक्कीच कमी होतील असे भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी सांगितले.

**शालेय अभ्यासात सदर प्रशिक्षणाची गरज - सीमा पवार**

शिरुर तालुक्यातील शाळांमध्ये सध्या किसान ऑल स्पोर्ट्स करिअर अकादमीच्या वतीने सुरु असलेले प्रशिक्षण हे शालेय अभ्यासातील क्रीडा प्रकारात सुरु करण्याची गरज असून त्यामुळे सर्वच मुली शाळकरी जीवनापासून स्वावलंबी बनतील असे सिमाई महिला आधार फाउंडेशनच्या अध्यक्षा सीमा पवार यांनी सांगितले.

cmyk